# आणि ग्रंथोपजीविये १

## रामदास खरे



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# आणि ग्रंथोपजीविये-१

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन मेल करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# आणि ग्रंथोपजीविये-१

लेखक : रामदास ग. खरे

# आणि ग्रंथोपजीविये-१

## लेखक : रामदास ग. खरे

**सी-२१३, चंद्रवदन सोसायटी क्र. १,**
**गणेशवाडी, कौशल्य हॉस्पिटल समोर**
**पांचपाखाडी, ठाणे-४०० ६०१.**
**भ्रमणध्वनी : ९८६९०१४३१९ आणि ७५०६२६०२७४.**
**इमेल : rgkhare64@gmail. com**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : १० सप्टेंबर२०२१ (गणेश चतुर्थी शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## *** लेखकाचा परिचय ***



रामदास ग. खरे

जन्म: १३फेब्रुवारी १९६४, ठाणे.

वाणिज्य शाखेची पदवी.

तीस वर्षे बँकिंग क्षेत्रात काम. लेखनाबरोबरच चित्रकला, फोटोग्राफी, संगीत, दुर्गभ्रमंती, असे छंद जोपासत आहे. विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची दुर्मिळ अशी ३५० हस्ताक्षर-पत्रे संग्रहित केली आहेत. जून २०१८ मध्ये आर्ट-प्रिव्हिलेज, ठाणे येथे पहिले सोलो पेंटिंग प्रदर्शन संपन्न झाले. विविध पुस्तकांची, नियतकालिकांची मुखपृष्ठे रेखाटली आहेत.

**प्रकाशित साहित्य** : कवितासंग्रह: स्पंदन (१९९४), जीर्णदेव्हारा (२००४), सी. टी. स्कॅन- (२०१५), आता अटळ आहे (२०२१).

संकीर्ण : कॅलिडोस्कोप -(लेख संग्रह) २०१७, पत्रसंवादु (लेख संग्रह)- २०१८, चरित्र लेखन: प्रभो शिवाजीराजा - २०१८, शूर आम्ही सरदार- २०१९,

आगामी पुस्तके : मणिकर्णिका... राणी लक्ष्मीबाई, स्मरण महाराष्ट्राचे, निमित्त भटकंतीचे, भारतीय संगीत वाद्ये, असे घडले गांधीजी... एकूण तीन भाग,

सदर लेखन : लोकसत्ता, गावकरी, लोकमत, महाराष्ट्र दिनमान.

लाभलेले पुरस्कार :

अंकुर वाङ्मय पुरस्कार (२००४), शिवांजली साहित्य गौरव पुरस्कार, जुन्नर (२०१६), कोकण मराठी साहित्य परिषद, कल्याण शाखा आणि अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान -'अक्षरगंध' पुरस्कार (२०१९)

विविध ठिकाणी संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कविता सादरीकरण तसेच आकाशवाणी, मुंबई येथे कविता वाचन, कथा वाचन.

## ** लेखकाचे मनोगत **



***पुस्तकं ठेवू नयेत कडेकोट बंदोबस्तात***

***नाहीतर त्यांना वाळवी लागते***

***आपल्यातील अज्ञानाची!***

एका भल्या सकाळी माझ्या घरातल्या बुक शेल्फवर उन्हाची कोवळी उन्हं रांगू लागली. नकळत ओळी सुचल्या आणि कविताही अलगद बाहेर पडली. महत्प्रयासाने मी जी ग्रंथसंपदा जमवली आहे त्यातील काही पुस्तके माझ्याशी त्यादिवशी चक्क बोलू लागली."*आम्हाला पुन्हा बाहेर काढा, आमच्यावर लिहा, शब्दांचा विचार गंध दूरवर पसरू दे, ज्ञानाचा तेजोनिधी तळपू दे.*"

तत्क्षणी मनाने काहीबाही ठरवले. येस. उत्तम पुस्तकाचा परिचय वाचकांना द्यायचा. अगदी सातत्याने. बुक शेल्फ मध्ये नजर

टाकताच एकेक पुस्तक आम्हाला बाहेर काढा असे म्हणू लागले. लोकमतचे संपादक श्री संदीप प्रधान यांना ही कल्पना सांगताच त्यांनी लगेच 'आगे बढो' असा ग्रीन सिग्नल दिल्यावर दर रविवारी लोकमतच्या 'हॅलो ठाणे' पुरवणीत पुस्तक परीक्षण झळकू लागले. शीर्षकाचे नाव : 'आणि ग्रंथोपजीविये'. वाचन संस्कृती वाढावी त्यासाठी वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून हे सदर सुरु केल्यावर वाचक रसिक या पुस्तकांकडे वळतील, वाचतील, त्यावर चर्चा करतील, इतकाच उद्देश. लेखमालेला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. माझा उद्देश सफल झाला. और क्या चाहिए. लेखमालेसाठी पुस्तकांची निवड अगदी जाणीवपूर्वक केली. जुन्या पिढीतल्या लेखकांबरोबरच सध्याची तरुण लेखक मंडळी काय लिहीत आहेत हेही जाणून घेणे आवश्यक होते. त्यामुळे तो विचार करूनच लेखमाला सुरु केली. सर्व साहित्यप्रकार, विषय यामध्ये समाविष्ट व्हावेत याचाही सूक्ष्म विचार केला. कविता, कथा, कादंबरी, चरित्र, संपादन, व्यक्तिचित्रण, मुलाखती, नाटक, ललित, संकीर्ण, स्फुटलेखन, प्रवासवर्णन, निबंध, संगीत, चित्रकला वगैरे अशा सर्व विषयांच्या, आशयांचा अंतर्भाव या लेखांतून केला.

आणि ग्रंथोपजीविये, विशेषी लोकी इये ।
दृष्टादृष्टविजये, हो आवे जी ।।

आपणा सर्वांना माहिती आहेच की 'आणि ग्रंथोपजीविये' या ओळीचा ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदानात उल्लेख आहे. खूप पूर्वी म्हणजे साडेसातशे वर्षांपूर्वी मुद्रणकला अस्तित्वात नव्हती तरीही ग्रंथनिर्मिती होत असे. सुवाच्च हस्ताक्षर असलेल्या एखाद्या लेखनिकाची नेमणूक केली जात असे. त्या ग्रंथाची प्रत गावातील एखाद्या मोठ्या मंदिरात ठेवली जायची. त्याचे पठण होत असे. श्रोते जमत आणि ग्रंथातील विचार, प्रकाश सर्वदूर पसरे. अशा लेखनिक, निरुपणकार, पाठक, प्रवचनकार यांना या कामाचा मोबदला म्हणून धन किंवा वस्तू दिली जायची. म्हणजेच ही सारी मंडळी त्याकाळची ग्रंथोपजीवी होते असेच म्हणता येईल. हाच महत्वाचा विचार ज्ञानेश्वर माउलींनी आपल्या रचनेत प्रभावी पणे मांडला आहे. माउलींनी किती सुंदर अर्थ सांगितला आहे पहा''ज्यांनी ज्यांनी या ग्रंथाचे पालन, पठण केले आहे अशा सर्व लोकांना आपल्या दुष्ट, वाईट प्रवृत्तीवर विजय मिळवून ते समाधानी आणि सुखी व्हावेत.''

आज २०२१ उजाडले आहे. माध्यमे आणि तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. पण तरीही पुस्तकाचे महत्व जराही कमी झालेले नाही. जग बदलत आहे. तत्व, निष्ठा अबाधित राखून प्रत्येकाने काळाच्या बरोबर जाणे हे व्यवहार्य आहे. या साऱ्याचा विचार करून 'आणि ग्रंथोपजीविये' हे पुस्तक ईबुक स्वरूपात काढले तर पुस्तकातील विचारांचा गंध जगभरात कुठेही पसरू शकतो. तोही एका क्लिक सरशी! अशाच एका विचार वळणावर अवचितपणे ई - साहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनील सामंत यांचा परिचय झाला. त्यांच्याशी संवाद साधल्यावर सध्याच्या काळात ईबुक हा एक चांगला पर्याय असल्याचे मला जाणवले. त्यादृष्टीने तयारीही सुरु केली. ६ जानेवारी २०१९ ते २९ डिसेंबर २०१९ या कालावधीत लोकमतच्या 'हॅलो ठाणे' आवृत्तीत एकूण ३८ पुस्तक परीक्षणे प्रसिद्ध झाली. त्यानंतरच्या काळात लिहिलेली आणि सकाळ, रुची (ग्रंथाली) व इतरत्र प्रकाशित झालेली बारा अशी एकूण पन्नास परीक्षणे यांचे ईबुक करण्याचे ठरवले. श्री सुनील सामंत यांचे सूचनेनुसार या पन्नास लेखांचे चार भाग (प्रत्येकी १३ लेखांचे एक पुस्तक) करून चार ईबुक करण्याचे फायनल केले. लेखांसोबत त्या त्या पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि प्रकाशकांचा तपशील देखील देण्यात आला आहे.

ज्येष्ठ कवी, समीक्षक, निरुपणकार श्री अरविंद दोडे यांना ही कल्पना आवडली आणि त्यांनी या माझ्या पहिल्या ईबुक साठी पाठराखण (Blurb) केली आहे. त्यांचे मनापासून आभार. लोकमतच्या ठाणे कार्यालयाचे संपादक श्री संदीप प्रधान आणि स्नेहा पावसकर यांचे विशेष आभार. या प्रवासात सौ वृषाली शिंदे यांचीही मोलाची मदत झाली त्यांचेही आभार. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या ईबुकमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व पुस्तकांच्या लेखक-कवी मंडळींना, प्रकाशकांना शतशः धन्यवाद. त्यांच्याशिवाय ही लेखमाला पूर्णत्वाला गेलीच नसती.

'आणि ग्रंथोपजीविये' या माझ्या पहिल्या ईबुक पुस्तकाचा गंध जगभरातील वाचक रसिकांपर्यंत, ग्रंथालयांपर्यंत दरवळू दे अशी प्रार्थना श्री सरस्वती देवीच्या चरणी करतो आणि तूर्तास थांबतो.

रामदास खरे, ठाणे.

## शुभेच्छा

या पुस्तकात साधारणतः साठोत्तरीतील अभिजात ग्रंथांपासून आताच्या काळातील दर्जेदार ग्रंथांचा सखोल परिचय करून देण्यात आला आहे. आस्वादक समीक्षेला परीक्षणाचा वेगळा आयाम देताना कवी, लेखक, चित्रकार रामदास खरे यांचा हा वेगळा पैलू ग्रंथमित्रांसमोर येत आहे. दुर्गा भागवतांच्या 'पैस' पासून सुरु झालेल्या या यात्रेत ग्रेस, श्री. ना. पेंडसे, गोनीदा, जयवंत दळवी, मतकरी, महानोर, पाडगावकर, मधु मंगेश कर्णिक, खानोलकरांना सामावून घेत पुढील पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणारे अच्युत गोडबोले, मंगला आठलेकर, अशोक बागवे, डॉ. वसुधा सहस्रबुद्धे आदी नामवंतांचा सहभाग आहे. तर नव्या पिढीतील किरण येले, सतीश सोळांकूरकर, प्रतिभा सराफ, गीतेश शिंदे, सुजाता राऊत आदींच्या पुस्तकांची दखल घेताना रामदास खरे यांनी सारांशात त्या साहित्यिकांची वाटचालही अधोरेखित केली आहे. एकूण पन्नास लेखांची चार पुस्तके करण्याची कल्पना अभिनव आहे.

हा केवळ भाष्यग्रंथ नसून स्वतःची निरीक्षणे सुद्धा लेखकाने नोंदविलेली आहेत. हा एक सुंदर आणि संग्राह्य ग्रंथानुभव आहे. या 'ई-बुक' चे स्वागत वाचक- रसिक, ग्रंथप्रेमी करतीलच असा विश्वास आहे.

**अरविंद दोडे (कवी, समीक्षक, निरुपणकार)**

## ** अनुक्रमणिका **

1 साक्षात्कारी पैस... दुर्गाबाई भागवत

2"जैत रे जैत" चा थरार... गो. नी. दांडेकर

3 पाडगावकरांचा... 'सलाम'... मंगेश पाडगावकर

4 कातळ : परिवर्तनाची गोष्ट... मधू मंगेश कर्णिक

5 अस्वस्थ 'कळ्यांचे निःश्वास'... विभावरी शिरुरकर

6 संध्याकाळच्या कवितांचे गारुड.... ग्रेस

7 महानंदा : होरपळलेल्या दोन जीवांची कहाणी.... जयवंत दळवी

8 स्मरणगंध, रानातल्या कवितांचा.... ना. धों. महानोर

9 गारंबीचा बापू.... श्री. ना. पेंडसे


10 खानोलकरांची 'चानी'.... चिं. त्र्यं. खानोलकर

11 अकरा कोटी गॅलन पाणी.... अनिल बर्वे

12 मतकरींच्या गूढ कथांचे अरण्य.... रत्नाकर मतकरी

13 विचारचित्रांचा 'कोरा कॅनव्हास'.... प्रभाकर बरवे

# 1. ** साक्षात्कारी पैस”**




“गोदावरी आणि प्रवरा... या दोन नद्यांमधला एका लहानशा भागातल्या, अती साध्या गावात एक अद्भुत प्रतीक आहे. खांबाचे... खांब, तोही ओबडधोबड नि लहानखुरा... पण त्या खांबावरचा अदृश्य भाग एका समाधिस्थ जीवाला त्याच्या जीवनावधीतच भासमान झाला. त्याला त्या साक्षात्कारी युवकाने 'पैस' असे नाव दिले. अजूनही ज्ञानेश्वरी वाचा की त्या खांबाच्यावर पैसाचा पारदर्शक पसारा उभारलेला तुम्हाला दिसेल. म्हणून या

खांबाचे माझे नाव"पैसाचा खांब". लोक त्याला"ज्ञानोबाचा खांब" असेही म्हणतात. ख्रिस्ताचे प्रतीक क्रूस तसेच ज्ञानोबाचे प्रतीक हा खांब आहे. यालाच टेकून ज्ञानोबाने पैसाची मर्यादा पाहिली, काल व आकाश यांची सीमारेषा जोखली आणि मानवाच्या अंतःस्थ गहनतेची अमर्यादितता अनुभवली. भारतातला कुठलाही स्तंभ हा या विश्वकमळ तोलणाऱ्या दंडाचेच एक रूप असते. हा खांब पाहिला आणि मग ज्ञानेश्वराच्या समाधीचे आळंदीतले भुईतळचे स्थानही विसरायला झाले. मनात उभा राहातो याला टेकून बसून, शांत स्वराने ज्ञानेश्वरी वदणारा नवतरुण योगी. ज्ञानेश्वरीत आलेले बौद्धांचे वार्तिक पण आठवले. वारकरी संप्रदायात विठोबाला बौद्ध अवतार का म्हणतात, तेही लक्खकन आकळले. बुद्धाचे दीर्घायुष्याचे व नैसर्गिक मरणाचे आणि ज्ञानेश्वरांच्या अल्पायुष्याचे आणि समाधिस्थ मरणाचे दृश्य अविष्कार विरोधी वाटले तरी त्याची सांगता एकाच निर्वाणात अथवा महाशुन्यात होते."

थोर विदुषी दुर्गाबाई भागवत यांच्या 'पैस' या ललित लेख संग्रहातील 'पैसाचा खांब' या लेखात त्यांनी व्यक्त केलेले हे विचार. मौज प्रकाशन यांनी १९७० मध्ये प्रकाशित केलेला 'पैस' हा ललितलेखसंग्रह माझ्या महाविद्यालयीन शिक्षणानंतर म्हणजे साधारणतः १९८५ च्या आसपास वाचनात आला. वाचनालयात वाचलेले हे पुस्तक नंतर मी विकत घेऊन झपाटल्यासारखे वाचले.

सदर संग्रहात एकूण तेरा लेख आहेत आणि ते तेरा लेख पुस्तक प्रकाशन होण्यापूर्वीच विविध नियतकालिकांमधून (सत्यकथा, मौज, अभिरुची, साधना) प्रकाशित झाले होते. ते ललितलेख वाचून मी विलक्षण प्रभावित झालो होतो. दुर्गाबाईंनी आपण लेखनाला कधी सुरवात केली, लिहिण्याची उर्मी कशी गवसली पासून थेट हिंदुस्तानांत वेगवेगळ्या प्रांतात भ्रमंती केल्यावर जे काही संचित त्यांना गवसले त्याचा सखोल अभ्यास करून त्याची पार्श्वभूमी जाणून ते आपल्या वेगळ्या लेखनशैलीत सादर करून वाचकाला एका अदभूत प्रांतांचा, तिथल्या, ऐतिहासिक, सामाजिक घडणींचा रसपूर्ण परिचय करून दिला आहे. स्वच्छंद या लेखापासून सुरवात होते. पुढे पैस, पंढरीचा विठोबा, जोगवा, द्वारकेचा राणा, यमुना- कालिंदी, नैनीच्या पुलावर, महेश्वरची महाश्वेता, ख्रिस्त-संगत, डोंगरमाथ्यावर, ऊनपारखी, आसन्नमरण काळी राणी आणि बुद्ध-प्रलोभन अशा विविध शीर्षकाअंतर्गत काही गहन विषयांवर दुर्गाबाईंनी जे काही अभ्यासपूर्ण लेखन केले आहे ते वाचून आपण स्तंभित होतो, थक्क होतो आणि थोडे प्रगल्भ देखील होतो. हे ललित लेखन वाचताना दुर्गाबाई आपणाला एका वेगळ्या उंचीवरचे तत्त्वज्ञान देतात आणि त्याचवेळी एका वेगळ्या प्रकारची अनुभूतीही देतात.

थोर विदुषी दुर्गाबाई भागवत यांचे नुसते स्मरण तरी झाले की माझ्या मनात दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ही आरती निनादू लागते. दुर्गाबाईं या एकाच व्यक्तीमध्ये वेगवेगळी कौशल्य कशी सामावली होती त्याचा थोडक्यात परिचय करून देणे आवश्यक वाटते. मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, बुद्ध धर्माच्या विशेष जाणकार, संस्कृत, पाली, बंगाली, जर्मन अशा विविध भाषांवर प्रभुत्व, आदिवासी जीवनाच्या भाष्यकार, लोकसंस्कृतीच्या अभ्यासक, निसर्गातील अदभूत सत्य आणि सौंदर्य टिपण्याचा प्रयत्न करणाऱ्या, पाकशास्त्र, शिवणकाम, भरतकाम या कलांमध्ये संशोधन करणाऱ्या, उत्तमोत्तम आणि दुर्मिळ अशा अनेक मराठी, इंग्रजी पुस्तकांचा संग्रह करणाऱ्या दुर्गाबाई यांच्या लेखनाची व्याप्ती, खोली किती विलक्षण होती याची प्रचिती आपणास वारंवार येतेच. महाराष्ट्रातील एकूणच साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय विषयांवर विपुल आणि परखडपणे लेखन करणाऱ्या, प्रसंगी अनिष्ट प्रथांविरुद्ध उभ्या ठाकणाऱ्या दुर्गाबाई मला तर खरोखरच श्रीदुर्गेचा प्रत्यक्ष अवतारच वाटतात. मुक्त विचार हाच संस्कृतीचा मूलाधार आहे यावर दुर्गाबाईंचा ठाम विश्वास होता. त्यांच्या प्रत्येक लेखनकृतीमधून तो वाचकाला जाणवतोच.!

अवघ्या एकशे चव्वेचाळीस पानांमध्ये आणि तेरा लेखांमध्ये दुर्गाबाईंनी हे अप्रतिम आणि अदभूत शब्दवैभव उभे केले आहे. कुठलेही पान सहजपणे उघडावे आणि त्यात रमून जावे आणि संपूर्ण पुस्तक वाचूनच खाली ठेवावे असे काही आहे हे. पहिल्याच 'स्वच्छंद' लेखात अगदी सुरवातीच्या आपल्या लेखन प्रवासाबद्दल दुर्गाबाई संवाद साधतात.''ललितलेखन माझे ध्येय नव्हते. मी वाचनवेडी होते. वाङ्मय हे माझ्या मनातले मुक्त विहाराचे स्थान होते. सुरवातीस काही कविता केल्या, त्या कवितांचे एकमेव वाचक माझे वडीलच होते. मात्र पुढे कॉलेजात गेल्यावर एका क्षणी मी केलेल्या साऱ्या कविता जाळून टाकल्या. कधी कथा लिहायची लहर येई. मात्र त्या लिहून काढायच्या आणि जाळायच्या इतकेच मला माहित होते.! पुढे वाचनाची कक्षा बौद्धिक व ललित विषयात विस्तृत असल्याने एक प्रकारची निःपक्षपाती वैचारिक निष्ठा व बौद्धिक स्वातंत्र्य यांची प्रतिष्ठा माझ्या मनात आपोआप तयार झाली. एके काळी जंगलात भ्रमण करीत असताना विषारी सुरण खाल्ल्याने विषबाधा होऊन मी वर्षभर अंथरुणावर खिळून राहिले. आणि याच काळात 'ऋतुचक्र' माझ्याकडून लिहून झाले. पुढे साने गुरुजींशी परिचय वाढला. त्यांच्या साधना मासिकासाठी मी विपुल लिहिले. लेखनप्रवासात प्रा रा. ना. भागवत, रॉबर्ट ब्राउनिंग, डॉ श्रीधर व्यंकटेश केतकर, आणि आपले वडील यांच्याकडून खूप

काही शिकले. वाचकही लेखकाप्रमाणेच साहित्यकृती घडवतो अशी माझी श्रद्धा आहे आणि म्हणूनच वाचकांचा भार मी माझ्यावर न घेता त्यांच्यावर सोपवून मोकळी होते.''

संग्रहातील लेख वाचत असताना दुर्गाबाईंच्या व्यासंगाचा प्रत्यय वाचकाला येतोच. त्यातील काही लेखांमध्ये जे संचित मला भावले ते आपल्यासाठी शेयर करतोय इतकेच. 'पंढरीचा विठोबा' या लेखामध्ये दुर्गाबाईंनी आपल्या मूळच्या म्हणजेच पंढरपूर गावाबद्दलच्या काही भावूक आठवणी जागृत केल्या आहेत. सुरवातीला त्या सांगतात''घराण्याची शापित वास्तू इथे पडून आहे. कुणीच तिला वारस नाही. आजोबांनीं लहानपणीच आपल्या आईचा मृत्यू आपल्या वडिलांच्या क्रूर, अन्यायी वागणुकीमुळे त्या वास्तूत घडून आलेला पहिला नि त्या रक्तलांछित भूमीत परत पाय ठेवणार नाही अशी शपथ घेऊन ते घर सोडले ते कायमचे.! आजोबांनी सारे काही टाकले. बापाचे नावदेखील पांडुरंग होते तेहि टाकून दिले.! आजोबांनी देवळातला विठोबा सोडला पण ज्ञानेश्वर-तुकारामांचा विठोबा मात्र त्यांनी त्यांच्या ग्रंथातून जणू चोरूनच आणला. ग्रंथांच्या चावडीवर विठोबा आजोबांच्यापुरता स्थायिक झाला.''अशा पंढरपुरात खूप काळानंतर दुर्गाबाई जातात, तो वाडा पाहतात, विठोबाचे दर्शनही घेतात. दुर्गाबाई शेवटी म्हणतात''सुंदर ते ध्यान पाहिले. काळ्या मातीवर हुकूमत चालवणारा काळा

पाषाण सजीव झाला होता. तो मानवमूर्ती आणि देवमूर्तीही झाला होता. पंढरीच्या विठोबाचे व माझे पिढ्यांचे आंतरिक नाते नव्याने उजळले.!"


द्वारकेचा राणा लेखात द्वारकेबद्दलचे अनेक दुर्मिळ संदर्भ सांगितले आहेत. दुर्गाबाई म्हणतात''द्वारकेचा राणा नि चिरंतन दुःख दैन्य यांची अजोड सांगड मी प्रत्यक्ष पाहिली. पण त्याचा उलगडा भारतीय अध्यात्मात केलेला मात्र नुकताच भगवंतपुराणाच्या दहाव्या स्कंधात वाचला. श्रीकृष्णाच्या प्रयाणाचा भास द्वारकेत सतत अजूनही होतो.''यमुना-कालिंदी लेखात या दोन्ही शांत नद्यांचे श्रीकृष्णाशी असलेले अनोखे नाते फारच सुंदर शब्दात रेखाटले आहे. 'महेश्वरची महाश्वेता' या अप्रतिम लेखात अहिल्याबाई होळकर यांची सुंदर ओळख करून दिली आहे. पुढे ख्रिस्त-संगत या लेखात दुर्गाबाई म्हणतात''लहानपणच्या ख्रिस्ती शाळेतल्या प्रार्थनेची शिस्त अंगवळणी पडली होती; तोच तो आज्ञाधारक शिस्तशीरपणा आता चर्चच्या दारावरच्या पाटीने फिरून जागा केला. तेव्हा शाळेत प्रार्थना शिस्त म्हणून म्हंटली जायची तरी ही आपली प्रार्थना नाही अशी रुखरुखही लागे.!''मुंबईजवळच्या कान्हेरी लेण्यांच्या माथ्यावर गवसलेली हजारो वर्षापूर्वीची मृत्यूनगरी. भारतातले एकमेव प्राचीन बौद्ध स्मशान या कान्हेरी डोंगरमाथ्यावर वसले

आहे. या मृत्यूनगरीचे भयाण सौंदर्य दुर्गाबाईंनी’’डोंगरमाथ्यावर' या लेखांतून उलगडून दाखवले आहे. या संग्रहातील 'आसन्नमरण काळी राणी' आणि बुद्ध-प्रलोभन या लेखांमधून दुर्गाबाईंनी अजिंठ्याचे कलाविश्व, बौद्धकथा, शांतरस ई विषयांना स्पर्श केला आहे. दुर्गाबाईंनी आपल्या लिखाणात, साहित्यात कधी साचलेपण आणून दिले नाही किंवा कुठल्याही कुंपणात रमल्या नाहीत. नवीन विषय, नवीन प्रश्न, माहिती त्यांना सतत खुणावत असायची. अगदी अखेरच्या श्वासापर्यंत दुर्गाबाईंना जगण्याबद्दलची अपार उत्सुकता आणि ज्ञानसंपादन करण्याची उर्मी होती.

प्रत्यक्ष जी ए कुलकर्णी यांनी पैससारखे पुस्तक आपल्याला लिहिता आले नाही यासाठी दुर्गाबाईंबद्दल हेवा वाटल्याचे एकेठिकाणी म्हंटले आहे. 'पैस' या पुस्तकाला सन १९७१चा साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला होता. ऋतुचक्र (१९५६), व्यासपर्व (१९६२) आणि पैस (१९७०) ही तीन पुस्तके म्हणजे दुर्गाबाईंच्या लेखन प्रपंचातील वसंतोत्सव आहे.

(पैस (ललितलेख संग्रह), दुर्गाबाई भागवत, मौज प्रकाशन, मुंबई)

# 2. **”जैत रे जैत” चा थरार **




"करंगळी उभारून लिंगोबाचा डोंगर कधीकाळीचा वाडीच्या पाठीशी उभा आहे. करंगळीभवती इतिहासकाळी गडेकोट रचलेला होता. कुणी ते माहित नाही. मराठेशाहीत कधी क्वचित त्या गढेकोटात भवतालच्या राहाळाच्या देखरेखीसाठी पाहारा असे. पण लिंगोबा हा सह्याद्रीच्या माळात बराच आत दबलेला.

भवताली नामांकितपैकी खोरंही नाही. त्यामुळे पाहारा जगता राखण्यापलीकडे गढेकोटाने फारसं नामजद काम केलं नाही. मराठेशाही निमाल्यावर गढेकोट पार ढासळला. इथं तिथं उभ्या असलेल्या एखाद्या पडक्या बुरूजापलीकडे आता गढेकोटाचं कसलंही चिन्ह उरलेलं नाही. भोवतालचं रान राखीव जंगल आहे. करंगळीच्या, म्हणजे अदमासे दीडशे फूट उंचीच्या सरळसोट बुधल्याच्या पोटाशी मावळतीकडे बुद्धकालीन लेणं आहे. स्तूप नाही, नुसत्या खोल्याच काढलेल्या आहेत. शेजारी खडकात खोदलेली पाण्याची टाकी आहेत. उन्हाळयात जेव्हा सगळ्या राहाळात पाण्याचा खडखडाट होतो, तेव्हा टाक्यातून थंडगार पाणी भरलेलं असतं. अगदी दातात शिळक भरेल, इतकं गार. कधी क्वचित त्याच्यावर हिरवी साय येते. पण तेवढी बाजूला सारली, की खाली आरशासारखं गंगाजळनिर्मळ पाणी. जंगलात फेरफटका करणारा फॉरेस्टगार्ड, कंदमुळं काढणारे ठाकर, मोळयांसाठी फाटी गोळा करणाऱ्या ठाकरणी, अन अगदीच कधी क्वचित वाघरामागं हिंडणारे शिकारी, ही सगळी रानभटकी माणसं हे पाणी पितात. धापतात. मनं उमलून त्यांच्या मुखातून टाकं खणणाऱ्यांसाठी आशीर्वादाच्या माळा बाहेर पडतात. पण लिंगोबाचा डोंगर ठाकरवाडीत प्रसिद्ध आहे, तो या पाण्यासाठी नव्हे, त्यावर

उगवणाऱ्या वनस्पतींसाठी नव्हे. बुधल्याच्या पोटाशी असणाऱ्या लेण्यासाठीही नव्हे.''

पनवेल नजीक पळस्पे गावाजवळ आल्यावर तेथील महामार्गास दोन फाटे फुटतात. डावीकडचा रस्ता जातो पुण्याकडे तर दुसरा सरळ जातो कोकणात, थेट गोव्यापर्यंत. आपणापैकी अनेक जणांनी नोकरी धंद्यांच्या अथवा पर्यटनाच्या निमित्ताने बहुसंख्य वेळा पनवेल-गोवा महामार्गावरून गेला असाल. साधारणतः पंधरा-वीस मिनिटांनी कर्नाळा खिंड लागते, आणि डावीकडच्या खिडकीतून कर्नाळयाचा अंगठा आपल्याला खुणावू लागतो. वेगवेगळया निमित्ताने मी त्या रस्त्याने अनेकवेळा गेलो आहे, पण प्रत्येक वेळी कर्नाळयाचे ते दाट राखीव जंगल, आणि कर्नाळयाचा उभा डोंगर, किल्ला वेगळी वेगळी अनुभूती देतात. या कर्नाळा किल्ल्यावर जाऊन आलो आहे, त्याचे ऐतिहासिक महत्व देखील मी जाणून घेतले आहे. इ. स. १६५७ मध्ये शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकून घेतला. पुरंदरच्या तहात शिवाजी महाराजांनी मोगलांना जे बावीस किल्ले दिले त्यात या किल्ल्याचा समावेश होता. १६७० नंतर महाराजांनी पुन्हा हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. १७४० मध्ये किल्ला पेशव्यांच्या अधिपत्याखाली आला. पुढे १८१८ मध्ये इंग्रजांनी हा किल्ला जिंकला. आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे आजोबा

या कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. त्यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध मोठा लढा दिला होता. इतकं सारं असूनही मला हा कर्नाळ्याचा परिसर भावला तो एका अप्रतिम शब्दकळा सजलेल्या सुंदर कादंबरीने. सन १९६५ मध्ये कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने 'जैत रे जैत' ही छोटेखानी कादंबरी प्रकाशित केली होती. नाग्या आणि चिंधीची विलक्षण आणि चटका लावणारी प्रेमकथा वाचून मी भारावलो होतो. मराठीतल्या एका सिद्धहस्त लेखकाने म्हणजेच दुर्गमहर्षी गो. नी दांडेकर यांनी लिहिलेल्या या कादंबरीने माझे अवघे शालेय, कॉलेज जीवन समृद्ध झाले. त्यावेळी मला गडकोट किल्ले पाहण्याचा छंद जडला होता. कर्नाळा किल्ल्यावर मी अनेकवेळा गेलो. आज त्या कादंबरीला पन्नासहून जास्त वर्षे झाली आहेत. आजची तरुणाईंना या किल्ल्यांचे महत्व पटले आहे आणि ते ट्रेकिंगच्या निमित्ताने अनेकवेळा किल्ल्यावर जातातही.! आजच्या काळात ही कादंबरी तरुणाईपुढे आली तर ती कादंबरी पुन्हा एकदा दणक्यात गाजेल, लोकप्रिय होईल. असो. अप्पा दांडेकर. एक विलक्षण व्यक्तिमत्व.''राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा''अशा महाराष्ट्रावर अप्पांचे अतोनात प्रेम. बराचसा महाराष्ट अप्पांनी पायी हिंडून डोळसपणे पाहिला आहे. किल्ले, जंगलं, लेण्या, मंदिरे सारं सारं डोळ्यात साठवल्यानंतर ते सौंदर्य, त्या आठवणी, ती अनुभूती आपल्या विलक्षण शब्दकळेने

कागदावर जिवंत करणारे आमचे अप्पा. वाचकांनी देखील त्यांच्या साहित्यावर भरभरून प्रेम केले. लोकसंस्कृती, संतपरंपरा, प्राचीन साहित्य, ऐतिहासिक वारसा, बोलीभाषा, याचे उत्तम ज्ञान आणि त्या भाषेवर विलक्षण प्रभुत्व असणारे बहुपेडी अप्पा दांडेकर. त्यासाठी अप्पांनी लिहिलेले 'महाराष्ट्र दर्शन' हे अप्रतिम पुस्तक जरूर वाचा. अप्पांच्या अनेक कथांचा आणि कादंबऱ्यांचा उगम त्यांनी केलेल्या भटकंतीत गवसलेल्या एखाद्या प्रसंगातून, अनुभूतीतून झाला आहे. त्यापैकीच एक साहित्यकृती म्हणजे 'जैत रे जैत'. जैत रे जैत हे शब्द अप्पांना ज्ञानेश्वरीत गवसले.

कादंबरीच्या प्रारंभीच अप्पा वाचकांशी थेट संवाद साधतात, आणि या कादंबरीचे बीज आपल्याला कुठे गवसले हेही सांगतात.''शपथपूर्वक सांगतो, की कर्नाळावरचा दीडशे फूट उंचीचा टेम्भा मी पाहिला, आणि चकित होऊन उभा राहिलो. अवघ्या सह्याद्रीमंडळात या जातीचा कडा नाही. मग दिसली त्या कड्यापोटी चहूबाजूंनी लोंबलेली भली प्रचंड पोळी आगामाशांची, त्या पोळ्यांचा मध कुणी काढू शकेल, यावर माझा विश्वास बसेना. नंतर बसला. गेल्या चारसहा वर्षात कर्नाळ्यावर चारपाचदा जाऊन आलो. अनेकदा तिथे रात्रीचा मुक्काम केला. खाली तळात वाघरू डुरकत होते. आगटीजवळ मी अन नाग्या ठाकर शेकत होतो.

शेकता शेकता नाग्याला गोष्ट सांगू लागलो. नाग्या असा काही हरिखला! ती तर त्याच्या घरचीच गोष्ट होती!”

कर्नाळयाच्या डोंगराच्या पोटाशी पहुडलेल्या एका ठाकरवाडीत ही कथा आकार घेते, शांतपणे बहरत जाते, नाग्या. ठाकरवाडीतल्या भगताचा पोर. लहानपणापासूनच ढोलाचे आणि कर्नाळयाच्या टेम्भ्याचे त्याला प्रचंड आकर्षण. अजून एक खूळ त्याने घेतलंय. त्याला पुण्यवंत व्हायचे आहे. त्याला डोंगरावर बसलेला महादेव पाहायचा आहे. त्यासाठी त्याने ठाकरांना प्रिय असलेला उंदीर आणि मोर खाण्याचे ठरवले आहे. सगळयांशी मिळून मिसळून वागतोय. नाग्याच्या बापाला म्हणजेच मोठ्या भगताला याचे आश्चर्य वाटत असते. नाग्या मोठा होतो तसा त्याला वाडीचा भगत होण्याची दिक्षा नाग्याचा बाप देतो. बाप नाग्याला एक मंत्र देतो.”उतू नको मातु नको. कुणाच्या वाटेला जाऊ नकोस, पण कोणी तुझ्या कोणी वाटेला गेलाच तर त्याला डसल्याबिगर राहू नकोस.” नाग्या आता वाडीचा भगत होतो. वाडीच्या उपयोगी पडू लागतो. अगदी त्याचवेळी भगताच्या बापाला रानात मोठा नाग दंश करतो. नाग्याला कळवले जाते. पण मी पुण्यवंत आहे, बाबाला काहीही होणार नाही हा विश्वास बाळगून बाबावर मंत्र टाकतो. पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. नाग्याचा बाप मरतो. नाग्याला प्रचंड धक्का बसतो. तर दुसरीकडे नाग्यावर आणि नाग्याच्या

ढोलावर विलक्षण प्रेम करणारी ठाकरवाडीतली चिंधी. कामामध्ये आणि बोलण्यात अफाट. कुणी ठाकर तिच्या वाटेला जात नसे. नाग्या तिला आवडतो, मात्र तिचे लग्न झाले असते पण नवरा धडागुणांचा नसल्याने एकेदिवशी चिंधी त्याला काडीमोड देते आणि थेट नाग्याला जाऊन मिळते. अशाच वेळी एक विपरीत घडते. नाग्या जंगलात फाटी तोडण्यासाठी गेला असता मधमाशांचा लोळ त्याच्या अंगावर कोसळतो. त्यातून तो कसाबसा वाचतो मात्र एक डोळा कायमचा जातो. त्यामुळे तो परावलंबी होतो. आपण पुण्यवंत असूनही आपल्या नशिबी हे भोग का? असे प्रश्न पडत असतानाच चिंधी त्याला सावरते. त्यांचा पुढे पाट (लग्न) लावला जातो. त्याच रात्री अस्वस्थ नाग्या आणि चिंधी एका मोठ्या मोहिमेवर निघतात. ती मोहीम कोणती असते? पोळयात बसलेली ती राणीमाशी म्हणजे कोण? त्यात कोणाचा जय होतो, कोणाचा पराभव होतो? त्या कड्याच्या पोटाशी कोणते थरारनाट्य घडते? याचे सारे प्रश्न आपल्याला कादंबरीत मिळू शकतात. एकदा ही कादंबरी वाचायला घेतली की पूर्ण होईपर्यंत आपण ती खाली ठेवतच नाही. आणि जेव्हा ती वाचून पूर्ण होते तेव्हा आपण नकळतच कर्नाळा खिंडीच्या परिसरात, त्या जंगलात वाजणाऱ्या ढोलांच्या आवर्तनात आणि ठाकरांच्या अनोख्या साम्राज्यात कधी जावून पोहोचतो तेही समजत नाही.

मंगेशकर कुटुंबीय आणि अप्पा दांडेकर यांचे जिव्हाळ्याचे नाते सर्वश्रुत आहे. अप्पांनी तर या कादंबरीतील 'चिंधी' ही व्यक्तिरेखा लिहिताना त्यांच्या नजरेसमोर चक्क आशाताई भोसले या होत्या. तसा स्पष्ट उल्लेख प्रारंभी वाचकास मिळतो. पं. हृदयनाथ मंगेशकरांना या छोटेखानी कादंबरीने झपाटले होते. त्यात त्यांना नाट्य आणि सुरांचे आकार दिसत होते. १९६६-६७ च्या सुमारास त्यांनी या कादंबरीवर सुंदर चित्रपट निघेल असा विचार केला होता मात्र त्यावेळी दिग्दर्शक, निर्माता माधवराव शिंदे यांना ही कथा रुचली नाही, त्यांना ती प्रायोगिक वाटली. पुढे तब्बल दहा वर्षानंतर म्हणजेच इ. स. १९७७ मध्ये मंगेशकरांनी निर्माता, संगीत दिग्दर्शक ही भूमिका घेऊन चित्रपट बनवला. त्याचे दिग्दर्शन डॉ जब्बार पटेल यांचे होते आणि गीतकार ना. धो. महानोर. या चित्रपटाच्या निमित्ताने सर्वांनी वेगवेगळे प्रयोग केले. नेहमीच्या पेक्षा वेगळे, थोडे हटके. दुर्दैवाने चित्रपट चाललाच नाही, मात्र त्यातील सर्वांच्या सर्व गाणी प्रचंड गाजली. महानोरांचे शब्द आणि बाळासाहेबांच्या अनवट चाली आजच्या तरुणांच्या ओठी अजूनही गुंजत आहेत ही त्या चित्रपटाची खरी कमाई. अजूनही त्या. निसर्गरम्य कर्नाळाच्या परिसरात प्रवास करताना नाग्या-चिंधीची विलक्षण कहाणी अदृश्यपणे आपला पाठलाग करते.

(जैत रे जैत (कादंबरी), गो नी दांडेकर, कॉन्टिनेन्टल, पुणे)

# 3 ** पाडगावकरांचा... 'सलाम' **




नाक्यावरच्या दादाला सलाम,

हातभट्टीवाल्याला सलाम,

स्मग्लरला सलाम,

मटकेवाल्याला सलाम,

त्यांनी पेरलेल्या हप्त्यांना सलाम,

लोकशाहीलाबी सलाम,

ठोकशाहीलाबी सलाम,

सत्तेचा ट्रक चालवणाऱ्यांना सलाम,
ट्रकखाली चिरडलेल्या
गांडुळांना, कुत्र्यांना सलाम,
ज्याच्या हातात चाकू त्याला सलाम,
विमानातून बॉम्ब फेकणाऱ्यांना सलाम,
शस्त्रास्त्रांच्या प्रचंड व्यापाऱ्यांना सलाम,
काळाबाजारवाल्यांना सलाम,
त्यांना फाशी देण्याची घोषणा करणाऱ्यांना सलाम,
गटारातल्या पाण्याने इंजेक्शने भरणाऱ्यांना सलाम,
तिरडीचे सामान विकणाऱ्यांना सलाम,
तिरडी उचलणाऱ्या खांद्यांना सलाम,
मौत सस्ती करणाऱ्या सर्वांना सलाम,
सलाम, प्यारे दोस्तों, सबको सलाम.

वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षांपासून काव्यलेखनाला केलेला प्रारंभ. पुढे तब्बल सव्वीस कविता संग्रह, दहा बालकवितांची पुस्तके, चौवीस अनुवाद संग्रह, दहा संपादने, चार ललितलेख संग्रह, दोन समीक्षा ग्रंथ आणि इतर लेखन, असा अविरत लेखन प्रवास अगदी सातत्याने चालू होता तो अगदी

आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत!. प्रसन्न आणि लयदार भाषाशैलीचे वरदान लाभलेले साहित्यक्षेत्रातले एक दिलखुलास व्यक्तिमत्व म्हणजे कविवर्य मंगेश पाडगावकर. त्यांची चिकित्सक परंतु तितकीच खट्याळ चेहऱ्याची छबी आपल्या डोळ्यासमोर दिसताच त्यांनी साकारलेल्या अनेक अवीट, सुरेल भावगीतांचा प्रवास एखाद्या मयूरपंखासारखा शांतपणे उलगडत जातो. तर दुसरीकडे धारानृत्य' (१९५०) ते 'अखेरची वही' (२०१३) पर्यंतचा पाडगावकरांच्या कवितालेखनाचा विशाल कॅनव्हास देखील आपल्या नजरेसमोर झर्र्कन तरळतो.

पाडगावकरांच्या सुरवातीच्या लेखनावर कुसुमाग्रज, बोरकरांचा स्पष्ट प्रभाव दिसतोच. त्यानंतर मात्र त्यांना आपली वेगळी वाट सापडली. 'जिप्सी' (१९५३) या कवितासंग्रहाने पाडगावकरांना कवी म्हणून अशी खास ओळख दिली. प्रेम भावनांच्या अनेक छटा, संवेदनशील मनोवृत्तीचे हळुवार दर्शन या जिप्सीत अंतर्भूत केलेल्या कवितांमध्ये आपणाला दिसते. पुढे पाडगावकरांनी भावगीत प्रांतात जी काही मुशाफिरी केली त्याचे मूळ या जिप्सीत दडलेल्या अनेक विशुद्ध प्रेमकवितांमध्ये होते. अशा पार्श्वभूमीवर पाडगावकरांच्या कवितेवर काही जणांनी 'रोमँटिक' असा शिक्का देखील मारला. मात्र पाडगावकरांनी अशा टीकाकारांना, समीक्षकांना भीक घातली नाही. कविता हाच ध्यास

आणि हाच श्वास मानून पाडगावकर अगदी प्रामाणिकपणे शेवटच्या श्वासापर्यंत लिहीत राहिले आणि एक कवी म्हणूनच जगले. तरीही पाडगावकर कुठल्याही विशिष्ट साच्यात कधीच अडकून पडले नाहीत. कवितांच्या प्रांतात त्यांनी नवनवे प्रयोग केले. निसर्ग कविता, प्रेम कविता, बालकविता, भावकविता आणि सामाजिक-राजकीय प्रांतातल्या कविता पाडगावकरांनी रेखाटल्या. या साऱ्या प्रवासात पाडगावकरांची 'आनंदयात्री-भावकवी' अशी खरी ठळक ओळख झाली. सौंदर्यपूजक, गुढरम्यतेचे अफाट आकर्षण, स्वच्छंदतावादी आणि जीवनाचे गाणे अगदी आनंदाने गाणारे पाडगावकर एकीकडे दिसतात. आणि.. आणि.. दुसरीकडे??

'पाचूच्या हिरव्या माहेरी ऊन हळदीचे आले' सारखे तरल भावकाव्य लिहिणारे पाडगावकर अचानक एके दिवशी उपरोधाच्या सुरात व्यक्त होऊ पाहतात.

सलाम,
प्यारे भाइयों और भैनों, सबको सलाम,
अनेक हात असते
तर अनेक हातांनी केला असता सलाम,
लेकिन माफ करना भाइयों,
हात तर दोनच
आणि त्यातला डावा

लाथेच्या भयाने ठेवलेला गांडीवर
म्हणून फक्त उजव्या हाताने सलाम,
सलाम, सबको सलाम
भाइयों और भैनों, सबको सलाम.

पाडगावकरांचे हे अनोखे रूप पाहून आपण मनोमन हादरून जातो. हा विलक्षण बदल पाडगावकरांच्या मनोवृत्तीत झाला की काव्यदृष्टीत? आणि हा बदल का झाला असावा याची उत्तरे आपण शांतपणे शोधू लागतो. जानेवारी १९७८ मध्ये पाडगावकरांचा 'सलाम' हा नववा कवितासंग्रह 'मौज' प्रकाशन गृहातर्फे प्रकाशित झाला. त्यावेळी अवघ्या साहित्य सृष्टीला या वेगळया शैलीत लिहिलेल्या कवितासंग्रहाची दखल ही घ्यावीच लागली. कविता संग्रहात साकारलेली उपरोधात्मक शैली आणि सूर, शब्दांचे आसूड, फटकारे हे पाडगावकर प्रेमी मंडळींना नवीन होते तर पाडगावकरांवर 'रोमँटिक' म्हणून शिक्का मारणाऱ्या टीकाकारांना, समीक्षकांना हा संग्रह म्हणजे एक सणसणीत चपराकच होती.

आपणा सर्वांना माहित आहेच की तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भारतात देशाची राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्था धोक्यात असल्याचे कारण सांगून १९७५-७७ या कालावधीत देशव्यापी

आणीबाणी जाहीर केली होती. या आणीबाणीच्या काळात प्रसारमाध्यमांच्या अधिकारावर तसेच व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणली होती. स्वातंत्र्याचा संकोच म्हणजे काय याची प्रचिती देशातील अनेक पत्रकार, लेखक, कवी, कलावंत, बुद्धिवादी मंडळी तसेच अनेक विचारवंतांना आली. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील जो तो या मुस्कटदाबीविरुद्ध व्यक्त होत होता. त्यामध्ये एक प्रकर्षाने नाव घ्यावे ते म्हणजे रणरागिणी, थोर लेखिका दुर्गाबाई भागवत यांचे. १९७५ सालच्या डिसेंबर मध्ये कऱ्हाड येथे भरलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष या नात्याने आपल्या भाषणात यशवंतराव चव्हाण यांचे उपस्थितीत लोकांच्या विचार-भाषण स्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार करून आणीबाणीचा प्रतीकात्मक निषेध केला. यामुळे अवघे साहित्यविश्व खडबडून जागे झाले आणि त्याचवेळी तत्कालीन शासनाला योग्य तो संदेशही दिला गेला.

थोर विदुषी दुर्गाबाई भागवत यांचे हे अनोखे रूप पाहून पाडगावकर विलक्षण प्रभावित झाले. सामाजिक जाणीवेची ओढ त्यांना स्वस्थ बसू देईनात. आणीबाणीच्या काळातले समाजमनातले हेच भय उपरोधाच्या सुरामधून कागदावर व्यक्त

करण्याचे पाडगावकरांनी ठरवले देखील.! त्याचवेळी दि. २० एप्रिल १९७५ रोजी पाडगावकरांनी 'सलाम' या उपरोधात्मक कवितेला जन्म दिला आणि इतिहास घडला.''जातिभेदांच्या उकिरड्यांना सलाम, या उकिरड्यांतून सत्तेचे पीक काढणाऱ्यांना सलाम, उपनिषिदे आणि वेदांना सलाम''असे काही गोळीबंद लिहिणाऱ्या पाडगावकरांची भूमिका वेगळी ठरली. अशाच उपरोधात्मक कवितांनी साकारलेला 'सलाम' हा कवितासंग्रह जानेवारी १९७८ च्या सुमारास मौज प्रकाशन गृहातर्फे प्रकाशित झाला. पाडगावकरांनी हा संग्रह अर्थातच रणरागिणी दुर्गाबाई भागवत यांना अर्पण केला. अर्पणपत्रिका अशी होती.''दुर्गा भागवत यांस कृतज्ञतापूर्वक-- आणीबाणीच्या अंधारात आत्मशक्तीची ज्योत तुम्ही जागी ठेवली.''सलाम संग्रहात पाडगावकरांनी फक्त आणीबाणीच्या कालावधीतच लिहिलेल्या कविता समाविष्ट केल्या नाहीत तर त्याही अगोदर लिहिलेल्या अशाच प्रवृत्तीच्या, धगधगणाऱ्या सर्वस्वी वेगळया कविता देखील समाविष्ट केल्या आहेत. या कवितांचा काळ १९६५ ते १९७३ असा दिसतो. याचा अर्थ तरल भावगीतांच्या दुनियेत व्यस्त असताना देखील पाडगावकरांनी अशा सामाजिक आशयाच्या कवितांचे लेखन यापूर्वीच केले होते. सलाम प्रकाशित होण्याची कारणे देखील वेगवेगळी आहेत. समकालीन बदललेले काव्यविश्व,

काव्यजाणिवा, साठोत्तरी दलित काव्याचा आलेला प्रवाह, बदलणारी सामाजिक-राजकीय समीकरणे, ई. सर्वात महत्वाचे म्हणजे 'सलाम' द्वारे पाडगावकरांनी ' स्वातंत्र्यप्रेरणा ही केवळ व्यक्तिगत नसून समाजनिष्ठही असते' हे जगाला दाखवून दिले.

पाडगावकरांच्या 'सलाम' या कवितासंग्रहाला १९८० चे साहित्य अकादमीचे पारितोषिक लाभले. हे पारितोषिक जाहीर होण्याअगोदर काही दिवस याच संग्रहाला राज्य सरकारचे पारितोषिक देखील मिळाले होते. मात्र पाडगावकरांनी हे पारितोषिक नाकारले. याचे कारण म्हणजे परीक्षकांनी बक्षिसासाठी निवडलेली तीन पुस्तके सरकारने वगळली. या प्रकाराचा निषेध करण्यासाठी पाडगावकरांनी राज्य शासनाचे पारितोषिक नाकारले. मात्र लेखन स्वातंत्र्याची प्रतिष्ठा मानणाऱ्या साहित्य अकादमीचे पारितोषिक मात्र पाडगावकरांनी स्वीकारले. २७ फेब्रुवारी १९८१ रोजी नवी दिल्ली येथे साहित्य अकादमीचे पारितोषिक स्वीकारण्यासाठी पाडगावकर गेले होते. त्या प्रसंगी त्यांनी केलेले संपूर्ण भाषणच सलाम संग्रहाच्या प्रारंभी 'निवेदन' म्हणून प्रकाशित केले आहे.’’नवनिर्मितीच्या प्रेरणेइतकीच माणसाची स्वातंत्र्याची प्रेरणा मला मोलाची वाटते. याच स्वातंत्र्याच्या प्रेरणेचे रक्षण करणे, तिच्यावर कुठल्याही स्वरूपात आक्रमण करणाऱ्या दादागिरीविरुद्ध

निर्भयपणे आवाज उठवणे ही 'सलाम' मधील कवितांची प्रबळ प्रेरणा आहे.''पाडगावकरांनी व्यक्त केलेले विचार आणि सलाम मधील कविता आजही आपल्याला अंतर्मुख करतात, स्वतःलाच काही प्रश्नही विचारतात.! प्रारंभीची सलाम ही संपूर्ण कविता प्रत्यक्ष पाडगावरांच्या तोंडून ऐकणे म्हणजे परमभाग्याचे लक्षण होते. अनेक कार्यक्रमातून पाडगावकरांना सलाम कविता सादर करण्याची फर्माईश व्हायची. मीही अनेकवेळा ही कविता त्यांच्या तोंडून ऐकली आहे. 'सलाम' मधील कवितांचा उपरोधात्मक सूर पुढे त्यांच्याच 'मोरू, उदासबोध, वात्रटिका अशा कवितासंग्रहातून आपणास वाचावयास मिळतो. जगण्यावर मनस्वी प्रेम करणारे, सकारात्मक विचारांनी भारलेले पाडगावकर 'सलाम' मध्ये मात्र आपणाला वेगळे भासतात, काही वेगळं सांगू पाहतात.! 'कवीची कविता हे त्याने स्वतःशी आणि जीवनाशी राखलेले सर्वश्रेष्ठ इमान आहे' असे उद्गार काढीत पाडगावकर 'साधी, सोपी कविता' आपल्यासमोर पेश करतात. सलाम कविता संग्रहाच्या अगदी शेवटची ही कविता तर प्रत्येक कवीशी जणू संवाद साधते.!


साध्या, सोप्या कवितेत या
पण तसे काहीच नाही,
कोणालाच त्रास नाही,

कोणालाच फास नाही,
खालून वाचा, वरून वाचा
उजवीकडून वाचा, डावीकडून वाचा,
कुठूनही वाचली तरी एकच,
कापणार तर कापा,
खालून, वरून, मधून कापा!
जेवढी उरेल तेवढी छापा,
जो कापील त्याचे भले,
जो वाचील त्याचे भले,
जो वाचील त्याचे भले...

अशी माझी कविता साधेपणा जपते
आणि वाचूनही कित्ती लवकर संपते.

(सलाम (कविता संग्रह), मंगेश पाडगावकर, मौज, मुंबई)

# 4. *** कातळ : परिवर्तनाची गोष्ट ***




पश्चिमेस पसरलेला अथांग अरबी समुद्र आणि पूर्वेकडे धावत सुटलेली सह्याद्रीची कणखर रांग आणि यात पहुडलेलं हिरवंकंच निवांत कोकण. आणि कोकण म्हंटलं की डोळ्यासमोर एखाद्या चित्रपटासारखं तरळू लागतात सुंदर, स्वच्छ, निळेशार समुद्रकिनारे,

घनगर्द देवरायांमध्ये लपलेली सुबक देवळं, प्राचीन लेणी, टुमदार कौलारू घरं, नागमोडी लाल मातीचे रस्ते, रानवाटा, आंबे, फणस, काजू, नारळ, पोफळीच्या समृद्ध बागा आणि सर्वात महत्वाचे या सर्वांमध्ये रमलेला पक्का कोकणी माणूस. या कोकणी माणसाने जीवापाड जपलेली लोकसंस्कृती, इथले सणवार, उत्सव, चालीरीती, परंपरा आणि खाद्यसंस्कृती. सारं सारं कोकणी वैभव डोळ्यासमोर उभं राहतं. अनेक चित्रकारांनी, शिल्पकारांनी, संगीतकारांनी तसेच लेखक-कवी मंडळींनी आपापल्या कलाप्रकारात या कोकणचे विहंगम दर्शन वेळोवेळी रसिकांना घडवले आहे. चिं त्र्यं खानोलकर, श्री ना पेंडसे, जयवंत दळवी, माधव कोंडविलकर, वसंत सावंत या लेखक-कवी मंडळींनी आपापल्या लेखनात इथल्या निसर्गाच्या साक्षीने विविध रंगढंगांच्या व्यक्तिरेखा समर्थपणे रेखाटल्या आहेत. याच मांदियाळीतलं एक महत्वाचं नाव. मधू मंगेश कर्णिक. कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक. कणकवली जवळचे करूळ हे त्यांचे मूळ गाव. कथा-कादंबरी-ललित लेखनातून त्यांनी कोकणी माणसाचा, त्याच्या मानसिकतेचा छानसा वेध घेतलेला आहे. आत्तापर्यंत मधुभाईंची पन्नासच्यावर पुस्तके प्रकाशित झाली असून महानगरीय कोलाहलाबरोबरच कोकणातल्या निसर्गाचे, विविध व्यक्तिरेखा त्यांनी रेखाटल्या आहेत. वयाच्या ९० व्या वर्षी

देखील त्यांचा उत्साह एखाद्या तरुणाला लाजवणारा आहे. लेखन अखंड चालूच आहे.

याच कोकणच्या पार्श्वभूमीवरची त्यांची एक गाजलेली कादंबरी. 'कातळ'. १९८५ मध्ये मॅजेस्टिक प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या कादंबरीत मधुभाईंनी माणूस आणि मातीच्या नात्याची विलक्षण कहाणी चित्रित केली आहे. सव्वाशे पानांची ही लघुकादंबरी वाचकरसिकाला अगदी सुरवातीपासूनच संमोहित करते. प्रख्यात चित्रकार सुभाष अवचट यांच्या कुंचल्यामधून साकारलेलं मुखपृष्ठ अप्रतिम. कणखर कातळ आणि माणसाचे नाते अधोरेखित करणारे हे पेंटिंग सुंदरच. कादंबरीतल्या कथानकाचा हा सारांश.

नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने कलकत्याला गेलेला दिगंबर कुवेसकर आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात आपली पत्नी तारा, मुलगा अवधूत आणि मुलगी अंबू हिच्यासह पुन्हा आपल्या कोकणातल्या देवगड जवळील 'गडगेबाव' या मूळ गावी मोठ्या आशेने आणि उमेदीने परततो. लहानपणी कधीतरी पाहिलेलं घर आता पूर्ण उध्वस्त झालेलं असतं. फक्त राहिलेली असतात ती जोती. आल्याआल्या त्याची गाठ पडते ती गावातल्या पाताळयंत्री, बेरकी, स्त्रीलंपट केशव शिरोळकरशी. गावचा खोत ही त्याची

ओळख. कुठलेही काम असो या खोताला ओलांडून काही करताच येत नसते. स्वतःचे घर बांधून होईपर्यंत काही दिवस दत्ताच्या देवळात दिगंबरला रहावे लागते. या खोतावर गावकऱ्यांचा उदंड विश्वास. भोळ्याभाबड्या गावकऱ्यांना गोड बोलून तो लुबाडत असतो, जमिनी बळकावीत असतो. दिगंबरची जमीन देखील याच खोताने खाल्लेली. दिगंबर जाब विचारतो मात्र पदरी पडते फक्त निराशा. दिगंबरचा मुलगा अवधूत हा बापासारखा साधा नसतो. वाईटांशी वाईट आणि चांगल्याशी चांगले ही त्याची ओळख. तो इथल्या माणसांचा, निसर्गाचा चांगलाच अभ्यास करतो आणि पुरत्या तयारीनिशी अवधूत थेट खोताविरुद्ध दंड थोपटतो. या लढ्यात त्याला अंकुश, निरंजन, शांत्या आणि चिऱ्याच्या खाणीवर काम करणाऱ्या अनेक कष्टकऱ्यांची मोलाची साथ मिळते. ज्या कातळामध्ये पूर्वी फक्त चिऱ्यांच्या खाणी काढल्या जायच्या त्याच कातळावर अवधूत आणि त्याचे मित्र आंब्यांची कलमे लावतात. तिथल्या लोकांना सहकाराचे महत्व सांगतो, त्यांना एकत्र आणतो. विविध योजना सुरु करतो. शुष्क कातळावर जणू नंदनवन फुलवतो. खोताला हा बदल अर्थातच आवडत नाही. प्रत्येक गोष्टीत तो अवधूतला विरोध करतो. परंतु निसर्गनियमानुसार म्हणा किंवा प्रारब्ध, नियती म्हणा. खोताला त्याची जबर शिक्षा मिळते. दिगंबर, तारा, अवधूत, अंबु आणि त्या निसर्गरम्य, सुंदर

गावाचे पुढे काय होते? यासाठी आपणाला ही प्रत्ययकारी लघु कादंबरी वाचायलाच हवी.

या लघु कादंबरीचा काल साधारणतः पन्नास वर्षांपूर्वीचा. तेव्हाचा निसर्ग, मागासलेपण, शिक्षणाचा अभाव, दुःख-दारिद्र्य आणि यात भरडलेला कोकणी माणूस कादंबरीत रेखाटला आहे. आज २०२१ साल उजाडले आहे. कोकण रेल्वे, उत्तम रस्ते, विविध प्रकल्प-योजना, उद्योग, शिक्षण-सुविधा, पर्यटकांसाठीच्या सुखसोयी, यामुळे कोकणाचा खरोखरच विकास झाला आहे का? तेव्हाच्या परिस्थितीमध्ये, निसर्गात प्रचंड बदल आज दिसत असले तरीही आजच्या कोकणी माणसाच्या मानसिकतेत बदल झाला आहे का? कोकणातले मागासपण तिथल्या निसर्गात नाहीये तर तिथल्या माणसांच्या स्वभावात आहे. कादंबरी वाचताना वेगवेगळ्या पातळीवरचे प्रश्न आपणाला पडतातच. कादंबरीत एकेठिकाणी असा उल्लेख आहे. कादंबरीचा नायक अवधूत काय म्हणतो पहा.

“कोकणात सारं काही आहे, निसर्गाची सर्व संपत्ती, पाणी, जमीन, समुद्र, मासळी, खनिजे, आंबा, काजू आणि तमाम साऱ्या गोष्टी - तरीही इथला माणूस दरिद्री का? तर तो काळाबरोबर बदलत नाही. इथला माणूस सर्वप्रथम बदलला पाहिजे. त्याचा

आळशीपणा, दुष्टपणा, स्वार्थीपणा, ढोंगीपणा आणि दुसऱ्याचे पाय ओढणारी खेकड्याची वृत्ती - नष्ट झालीच पाहिजे.''

१२७ पानांची ही लघुकादंबरी. वाचक पूर्ण वाचूनच ती खाली ठेवतो इतकी प्रत्ययकारी, प्रभावी. याचे सारे श्रेय अर्थातच मधुभाईंच्या लेखन शैलीला जातेच. . आज कोकण पूर्ण बदलले आहे. संदर्भ बदलले आहेत. परिवर्तन घडत आहे. निसर्ग तोच आहे. जो रोज भरभरून देत आहे. अवधूतसारखी आजची पिढी देखील इथल्या कोकणात काही नवीन प्रयोग करत आहे, लढत आहे, प्रश्न विचारत आहे, रुक्ष कातळावर नंदनवन फुलवण्याचे स्वप्न बघत आहे. कादंबरीचा शेवट याच आश्वासक, आशादायक नोट वर होतो.

(कातळ (कादंबरी), मधू मंगेश कर्णिक, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई)

# 5. ** अस्वस्थ 'कळयांचे निःश्वास' **




“मी 'कळयांचे निःश्वास”लिहिल्याला आता जवळजवळ ४५ वर्षे होत आली. लिहिताना आपण एक हातबॉम्ब तयार करीत आहोत, ही मला कल्पनाही नव्हती. पण पांढरपेशा समाजातील कित्येकांची अनुकूल प्रतिक्रिया झाली, त्याबरोबरच फार मोठ्या समाजाचा भयंकर संताप झाला. 'कळयांचे निःश्वास', विशेषतः 'हिंदोळयावर' यासारखी गलिच्छ, अश्लील पुस्तके लिहिणाऱ्या लेखिकेस ठार मारले पाहिजे, हे समाजविघातक कृत्य चालू देता उपयोगी नाही, अशी ओरड झाली. त्यावेळी लेखिका गवसली असती तर समाजाने जरी तिला ठार मारले नसते तरी तिची नोकरी

घालवली असती. आणि वाग्बाणांनी तिला जेर करून टाकले असते. पण लेखिका न गवसल्याने कित्येकांनी तिच्यावर मृत्युलेख लिहून मने शांत केली. हे ऐकून आता ती पुस्तके वाचणारांना आश्चर्य वाटेल.''(मनोगतातून... १९७६).

इ. स. १९३३ मध्ये लेखिका मालती बेडेकर (जन्म: १ ऑक्टोबर १९०५, मृत्यू : ७ मे २००१) म्हणजेच पूर्वाश्रमीच्या बाळूताई खरे यांनी लिहिलेला''कळयांचे निःश्वास' हा लघुकथासंग्रह प्रकाशित झाला. अनेक सामाजिक कार्यामध्ये हिरीरीने सहभाग घेणारी एक बंडखोर लेखिका, विचारवंत म्हणजे मालतीबाई बेडेकर अशी त्याकाळी त्यांची ओळख होती. दुसरी ओळख म्हणजे मालतीबाई या ख्यातनाम लेखक, चित्रपट दिग्दर्शक कै विश्राम बेडेकर यांच्या पत्नी होत. मालतीबाईंचे वडील 'खरे मास्तर' यांना शिक्षणाचे महत्व माहिती होते. मुलींना तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हेही ते जाणून होते. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी मालतीबाईंना मोठ्या जिद्दीने शिकविले. मालतीबाई पुढे बी. ए. बी. टी. एम ए. झाल्या. त्याकाळातली ही एक क्रांतिकारी घटनाच होती. पुढे त्या कन्याशाळेत मराठी, इंग्रजी आणि संस्कृत हे विषय शिकवीत. नंतर मालतीबाई अण्णा कर्वे यांच्या हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेत नोकरीला लागल्या (इ. स. १९२३). नोकरी सांभाळतानाच गरीब वस्तीत

जाऊन स्वच्छतेचे धडे देत, प्रौढशिक्षणाचे वर्ग घेत. आपले वडील खरे मास्तर आणि साहित्यिक श्री म माटे यांचे त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळे. मालतीबाईंनी जडणघडण इथेच झाली. या संस्थेतील स्त्रियांची एकूणच समाजातील स्थिती, त्यांची होणारी अवहेलना, विचित्र घुसमट पाहून त्या अस्वस्थ झाल्या. ते साल होते इ. स. १९३३. मालतीबाईंच्या मनात काहूर उमटू लागले, शब्द उमलू लागले. याच कालावधीत त्यांनी 'कळयांचे निःश्वास' हा लघुकथा संग्रह आणि 'हिंदोळयावर' ही कादंबरी लिहिली. या लेखनात मालतीबाईंनी स्त्रियांचे दुःख, वेदना, घुसमट, अस्वस्थता, प्रत्येक स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, हतबलता याचे वास्तव चित्रण केले. त्यांचे लेखन काळाच्या कितीतरी पुढचे आणि त्यावेळच्या सामाजिक परंपरेला छेद देणारे होते. मात्र हे सारे लेखन मालतीबाईंनी 'विभावरी शिरुरकर' या नावाने प्रसिद्ध केले. 'कळयांचे निःश्वास' प्रकाशित झाल्यावर अवघ्या महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली. कारण आजपर्यंत स्त्रियांच्या विविध प्रश्नांची साधी कुजबुज देखील कुठे घडायची नाही त्या काळात मालतीबाईंनी स्त्रियांच्या विविध प्रश्नांना, व्यथांना धीट शब्दांमध्ये वाचा फोडली. हे आक्रीत होते. या पुस्तकाच्या झंझावातात विभावरी शिरुरकर या नावाचा मोठा आगडोंबच उठला. अवघे समाजमन ढवळून निघाले. पुन्हा या पुस्तकाला श्रीधर व्यंकटेश

केतकर या अतिशय अभ्यासू पंडिताची प्रस्तावना लाभली होती. प्रत्यक्ष लेखिकेशी बिलकुल परिचय नसतानाही केवळ लेखनाची, शब्दांची जबरदस्त ताकद ओळखून त्यांनी प्रस्तावना लिहून दिली.

‘हे लेखन अतिशय अश्लील असे आहे, समाजमनावर त्याचे गंभीर परिणाम होतील, स्त्रियांची अब्रू उंबरठ्याबाहेर काढली जात आहे’ असा गदारोळ करून या पुस्तकावर त्वरित बंदी घालावी, त्याची होळी करावी अशा घोषणा होऊ लागल्या. पुण्यात तर या पुस्तकाची अंत्ययात्रा काढण्यात आली. इतकेच काय लेखिकेची पदवी काढून घ्या, त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल करा, कोर्टात खटला भरा अशी मोहीम उघडण्यात आली. अनेक वृत्तपत्रांमध्ये नियतकालिकात या पुस्तकाबद्दलच्या उलटसुलट प्रतिक्रिया भरपूर छापून आल्या. मात्र शेवटी या विभावरी शिरुरकर म्हणजे कोण हा प्रश्न गुलदस्त्यात राहिला. सर्वच थरावर या लेखिकेची यथेच्छ निंदा करण्यात आली. अशा अवघड परिस्थितीमध्ये मात्र आचार्य अत्रे आणि व्यंकटेश केतकर विभावरीच्या पाठीशी खंबीर उभे राहिले. आपल्या जाहीर व्याख्यानांमधून लेखिकेच्या लेखनाचे महत्व त्यांनी समाजाला पटवून दिले.

मालतीबाईंनी वेदकाळाचा, ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास केला होता. वेदकाळात स्त्रियांना कसे वागवले जात असे आणि आता कसे वागवण्यात येते हे त्यांना दिसत होते. प्रत्येक वेळी स्त्रियांना डावलणारा समाज हा ढोंगी, दुटप्पी आहे. स्त्रियांच्या एकूणच घसरणीला माहेर-सासरचे दोन्ही लोक, मित्रमंडळी तेवढेच जबाबदार असतात. संस्थेत काम करताना मालतीबाईंनी रोजच विलक्षण अशा असंख्य प्रसंगांना सामोरे जावे लागे. प्रत्येक केस वेगवेगळया प्रश्नांनी व्यापलेली असायची. पुरुषांना वेगळा न्याय, स्त्रियांना वेगळा. निराधार स्त्रियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न त्यांना रोज छळत असे. दारिद्र्यामुळे मुली परत घरी येत नसत त्या परस्पर वेश्या व्यवसायाकडे वळत असत. याविरोधात मालतीबाईंनी तर मोहीम उघडली होती. अनेक वृत्तपत्रात लेखनाद्वारे त्यांनी आवाज उठवला.

इ. स. १९७६ मध्ये पॉप्युलर प्रकाशन यांनी हाच लघुकथासंग्रह पुन्हा नव्याने प्रकाशित केला. यामध्ये खुद्द लेखिका मालतीबाईंनी जे मनोगत लिहिले आहे ते खरोखरच वाचण्यासारखे आहे. तीस पानांमध्ये व्यापलेल्या या मनोगतात मालतीबाईंनी विविध जाणिवांना, संदर्भांना, चित्रविचित्र आलेल्या अनुभूतींना स्पर्श केला आहे. काही ठिकाणी हळुवारपणे तर काही ठिकाणी आक्रमकपणे त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे.

एकूण अकरा कथांचा समावेश या पुस्तकात केला आहे. अवघ्या पंधरा दिवसात मालतीबाईंनी या अकरा कथा एका विलक्षण आवेगात लिहिल्या आहेत. हिंगण्याच्या विद्यार्थिनींच्या वसतिगृहात आणि पुढे मुलींच्या शाळेत शिक्षिका म्हणून काम करताना त्यांना स्त्रियांच्या कोंडमाऱ्याचे, दुर्दशेचे दर्शन झाले. या अभागी मुलींच्या दुर्दैवाचे दशावतार जवळून पाहताना मालतीबाई हादरून गेल्या. त्या मुलीच्याच तोंडून ऐकलेल्या एकेक कहाण्या ऐकून मालतीबाई निःशब्द झाल्या. मालतीबाईंचा पिंड हा मूळचाच बंडखोर असल्याने हे दाहक अनुभव शब्दबद्ध करणे त्यांना अत्यावश्यक वाटले. ते विविध प्रसंग, अनुभव मालतीबाईंनी आपल्या सशक्त अशा लेखनशैलीत गुंफले. त्यासाठी त्यांनी लघुकथा हा फॉर्म वापरला. आत्तापर्यंत पुरुष लेखकांनी स्त्रियांची भूमिका घेऊन विविध स्तरांवरचे लेखन केले आहे. मात्र असे निरीक्षण आहे की पुरुषांपेक्षा स्त्रियांची लेखनाची दृष्टी वेगळी असते, खूप भिन्न असते. मात्र असे लेखन स्त्री लेखकांनी खूप कमी केलेले आढळून आले आहे. या पार्श्वभूमीवर मालतीबाईंनी आपल्या सशक्त लेखनशैलीद्वारे स्त्रियांच्या एकूणच सामाजिक जाणिवांची, नातेसंबंधांची, शारीरिक, मानसिक घुसमटीची कहाणी चितारलेली आहे. यातील सर्वच अकरा कथांचा मागोवा इथे घेणे शक्यच नाही. एकेक कथा वाचताना त्यातील व्यथांची, वेदनांची

आवर्तने आपल्या मनामध्ये घुमू लागतात. त्यात उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे शोधताना आपली चांगलीच दमछाक होते.''तू आई का दावेदारीण?",''बाबांचा संसार माझा कसा होणार?""प्रेम की पशुवृत्ती?''"प्रेम हे विष की अमृत?''अशा शीर्षकाच्या कथा वाचून वाचक निःशब्द होतो. आपल्याच आईच्या किंवा वडिलांच्या भ्रष्ट आचरणामुळे वेगळेच दुःख भोगाव्या लागणाऱ्या अभागी स्त्रियांच्या कहाण्या, तसेच प्रेमात (शारीरिक देखील) असफल आणि विवाहबंधनात सुखी नसणाऱ्या, फसवले गेलेल्या स्त्रियांची घुसमट, नवऱ्याने टाकलेल्या त्यामुळे आईवडिलांनी नाकारलेल्या आणि यामुळे आलेल्या भयानक दारिद्र्यामुळे वेश्याव्यवसाय पत्करणाऱ्या स्त्रियांची मानसिकता मालतीबाईंनी लघुकथांद्वारे प्रभावीपणे पण संयतपणे रेखाटली आहे.

इ. स. २०१९ उजाडले आहे. आतातर स्त्रीपुरुषांचा एकूणच आचार, विचार, आहार आणि विहार यांच्या व्याख्या, संदर्भ समीकरणं अगदी पूर्णपणे बदलून गेली आहेत. स्त्रीपुरुषांच्या जाणिवा, प्रेम, विवाहबाह्य संबंध, यावर आता अनेक स्त्री लेखिका अगदी बिनधास्तपणे भरभरून लिहिताना दिसतात. पण ८६ वर्षापूर्वी म्हणजेच इ. स. १९३४ मध्ये मालतीबाईंनी जे समाजव्यवस्थेवर भाष्य केले होते ते काळाच्या किती पुढचे होते

याचे प्रत्यंतर आपल्याला होतेच. त्यावेळी तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या अनेक तरुणींनी, कुमारिकांनी, विधवांनी मालतीबाईंच्या कथा वाचल्या. त्यांना तर आपल्याच भंगलेल्या आयुष्याचे प्रतिबिंब कथांमध्ये दिसले होते. या लघुकथासंग्रहाच्या लेखिका विभावरी शिरुरकर या नावाची एक जबरदस्त क्रेझ या तरुण मुलींमध्ये त्या काळी होती. या कथांमुळे त्यावेळचा तथाकथित उच्चभ्रू बुद्धिवादी समाज मात्र पार ढवळून निघाला होता. आणि त्याचा परिणाम म्हणजे या पुस्तकावर टीकेची झोड उठवली गेली, त्यावर बंदी आणली गेली.

"कळ्यांचे निःश्वास"हा संग्रह कॉलेजच्या लायब्ररीत वाचल्याचे स्मरते आहे. या सदराच्या निमित्ताने हा संग्रह पुन्हा एका बैठकीत वाचला. आज प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने, नाही, तर त्यांच्या एक पाऊल पुढे, आजची स्त्री यशाची वेगवेगळी क्षितिजे काबीज करीत आहे. आर्थिक स्वातंत्र्यामुळे जीवनातले प्रत्येक निर्णय ती घेऊ शकते. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध, इथल्या व्यवस्थेविरुद्ध आजची स्त्री मोकळेपणे बोलू शकते, लिहूही शकते. इतकं सारं असूनही... शंभर वर्षांपूर्वी मालतीबाईंनी उपस्थित केलेले स्त्रियांच्या संदर्भातील अनेक प्रश्न, जाणिवा, वेदना अजूनही कालबाह्य वाटतच नाहीत. पुणे-मुंबईचा परीघ सोडल्यास महाराष्ट्रातील अनेक स्त्रिया कधी मानसिक तर

कधी शारीरिक अत्याचारानं बळी पडतच आहेत. इथली समाज व्यवस्था देखील त्यांना धड जगू देत नाही. आहे हे असे आहे. आणि म्हणूनच इ. स. १९३४ मध्ये मालतीबाई बेडेकर उर्फ विभावरी शिरुरकर यांनी केलेले हे लेखन खरोखरच कालातीत होते, यावर वाचकाचे शिक्कामोर्तब होते.!

(कळ्यांचे निःश्वास (लघुकथा संग्रह), मालती बेडेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.)

# 6. ** संध्याकाळच्या कवितांचे गारुड **




भुरभुरत्या संधिप्रकाशात भिजलेले
कार्तिकांतील धुके
डोळयांच्या बाहुल्यांना चिकटलेले
मायेचे क्षण.
सरकणाऱ्या क्षितिजावर ओळख

हरवून बसलेली छायावेळ.
अथांगपणात बुडालेले माझे
स्वप्नगंध.
एक हलकासा तरंग घेऊन मीहि
ढवळून काढावा आसमंत...
ही शिखरे मोडावीत...
ही झाडे सारावीत...
---हा पूल जोडावा...
आणि नसलेल्या सुरुंच्या झाडांना
द्यावी एखाद्या प्राचीन शिल्पाची
पार्श्वभूमि!

अगदी स्पष्टपणे स्मरतंय. महाविद्यालयात असताना शेवटच्या वर्षात साधारणतः १९८४ च्या सुमारास एका वाचनालयात नेमक्या संध्याकाळच्या वेळी कवी ग्रेस यांचा 'संध्याकाळच्या कविता' हा संग्रह हाती आला. सुरवातीच्या काही कविता वाचल्यावर हे सारं खूप वेगळं आहे, विलक्षण आहे, कोणीतरी मला संमोहित करीत आहे, आजूबाजूचे वातावरण भारावल्यासारखे झाले आहे आणि मी त्यात नखशिखांत भिनून गेलो आहे याची प्रचिती त्यावेळी आली. अगदी प्रांजळपणे कबूलही करतो मला त्या कविता

समजल्याच नाहीत. त्या कवितांना भिडण्याची ताकद माझ्यापाशी नव्हती किंवा त्या कविता समजून घेण्यास मी चांगलाच कमी पडत आहे हेही समजून चुकले. दुसऱ्या दिवशी सकाळी बाजारात गेल्यावर अर्थात पहिले काम केले. 'संध्याकाळच्या कविता' हा कविता संग्रह मी विकत घेतला आणि पुन्हा भारावल्यासारखा थेट घरी गेलो. ते चार दिवसात मी अभ्यास केला नाही. मात्र कवी ग्रेस आणि त्यांनी उभे केलेले शब्दांचे, अनुभूतीचे साम्राज्य समजून घेण्याचा प्रयत्न करू लागलो. कुठल्याही संमेलनाला, चर्चासत्रांना अथवा साहित्य विषयक उपक्रमांस अजिबात उपस्थित न राहणाऱ्या कवी ग्रेस यांच्याबद्दलचे कुतुहूल वाढू लागले, ओढ वाटू लागली. अज्ञातवास आणि कवी ग्रेस यांचे अतूट नाते असावे असेही मला वाटू लागले.

कवी ग्रेस म्हणजेच श्री माणिक गोडघाटे यांचा 'संध्याकाळच्या कविता' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह इ. स. १९६७ मध्ये प्रकाशित झाला. इन्ग्रिड बर्गमन या प्रख्यात स्वीडिश अभिनेत्रीला हा संग्रह अर्पण केला आहे. तो संग्रह मुंबईच्या पॉप्युलर प्रकाशन यांनी प्रकाशित केला. कविता संग्रहात आषाढबन, चंद्रधून, मरणगंध, स्मरणशिल्प, उर्मिलेच्या कविता आणि बर्फाच्या कविता अशा आशयपूर्ण शीर्षकाअंतर्गत कविता लिहिलेल्या आहेत. कवीने या कविता कधी लिहिल्या, कुठे

स्फुरल्या त्याच्या तारखा आणि स्थळे यांचाही तपशील दिलेला आहे. या कवितासंग्रहातल्या सर्वच कविता १९५८ ते १९६४ या कालावधीतल्या आहेत आणि त्या कविता केरळ, उटकमंड, मुंबई, पुणे, अंजनी चर्चयार्ड या ठिकाणी लिहिल्या किंवा स्फुरल्या आहेत. कवी ग्रेस यांचे वास्तव्य बहुतांशी नागपुरात असल्याने स्थळांचा उल्लेख न केलेल्या कविता नागपूरच्या समजाव्यात असा जाणीवपूर्वक तपशीलही संग्रहात आढळतो.

संधिप्रकाशातिल रेषेवर स्तब्ध थांबली गुरे
घाटापासुन घाट तुटे की अरण्य हृदयी भरे...

अशा काही अस्वस्थ करणाऱ्या ओळी पहा.. आणि दुसऱ्या कवितेत सांध्यरंगांचे निःशब्द आकार कवी ग्रेस यांना व्याकुळ करतात. ग्रेस काय सांगतात ते पहा.

या इथे, झाडांना उदासीन करणाऱ्या संधिप्रकाशात
मी जेव्हा ईश्वरी करुणांची स्तोत्रे म्हणू लागतो
मावळतीला, शेवटच्या किरणांची फुले समुद्राच्या
दिशाहीन पाण्यात बुडून जातात.. कुठे जातात?

उदास संध्याकाळचे हे चित्र कवीने किती ताकदीने रेखाटले आहे पहा. कविता संग्रहाच्या मलपृष्ठावर या ओळी आणि एकूणच

संध्याकाळच्या कवितांवरचे नेमके विवेचन वाचकाला अस्वस्थ करते.''संध्याकाळच्या कविता''त अनंत संध्यावेळा एकवटल्या आहेत. सगळया वेळांची मिळूनच झाली आहे एक दीर्घ संध्याकाळ. प्रकाशाचा मृत्यू होत असताना सृष्टीवर दाटून आलेले गहन आणि गहिरे औदासिन्य, दूर दूर पसरत गेलेली जडता, स्तब्धता आणि निःशब्द एकटेपण, या एकाकीपणात जाणवणारे, चिरंतन सोबत करणारे गूढ पण उदात्त दुःख आणि अशा दुःखातच पटणारी त्या अदभूत शक्तीच्या अस्तित्वाची ओळख.!''

संध्याकाळच्या कविता या संग्रहात ठिकठिकाणी निसर्गाच्या प्रतिमा, संदर्भ दिसतात मात्र या प्रतिमांमध्ये महानोर यांच्या कवितेसारखा प्रसन्नपणा दिसत नाही तर या सर्व निसर्ग छटांवर एकप्रकारची उदासी, एकलेपणाची, दुःखाची दाट छाया दिसून येते. कवीने रेखाटलेले हे अनोखे रूप आपल्या मनामधील उदासी, विषण्ण कोपऱ्यात अलगद कुठेतरी जावून बसते. विवर्त नभ, मावळतीच्या सरणावरती, गूढ घावांचे किनारे, गर्द शोकाच्या झाडांतहि, वैराण दिशांचा जोग, शून्यात गर्गरे झाड ई. मला तर असे वाटते की ग्रेस यांच्या कविता वाचताना अर्थाच्या फुटपट्या अजिबात कामाच्या नाहीत. या कविता ज्याने त्याने एकांतात भोगाव्यात. ग्रेस यांच्या एकूणच व्यक्तिमत्वाला अपार दुःखाचे, वेदनेचे जबरदस्त आकर्षण असावे असेही वाटून राहते. अनेक

कवितांमधून उदासिनता, व्याकुळता, खिन्नता यांचा सहज अविष्कार झाल्याचे आपणास जाणवते. याच संग्रहातील ही कविता पहा. पुढे या गाण्याला वेगळी अशी चाल देखील लावली गेली. ग्रेस यांच्या पाचव्या ललित लेखसंग्रहाचे शीर्षक म्हणजे या कवितेची पहिली ओळ होती. पुढे' वाऱ्याने हलते रान' या त्यांच्या पुस्तकाला सन २०११ चा साहित्य अकादमी पुरस्कार देखील लाभला.

वाऱ्याने हलते रान
तुझे सुनसान, हृदय गहिवरले
गाईचे डोळे करूण उभे की
सांज निळाईतले!

कवी या सनातन दुःखाचा जणू शोध घेत आहे, प्रसंगी या दुःखाशी त्याचा झगडा देखील आहे. कवीचे दुःख आदिम आहे हे आपणास सतत जाणवत राहते.

कवी ग्रेस यांची कविता पुस्तकांमध्ये अडकली होती ती कविता जनसामान्यांपर्यंत तितक्याच ताकदीने पोहचवली असेल तर ती पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी. ग्रेस यांची कविता समजून घेणे अवघड आणि त्याला चाल लावणे त्याहून. मात्र हृदयनाथांनी ग्रेसांच्या शब्दांना असा काही न्याय दिला ती गाणी अजरामर

झाली. यामुळे ग्रेस कळू लागले असे म्हणणे धाडसाचे होईल, मात्र स्वरांच्या सोबतीने त्यांचे शब्द काही बोलू लागले, संवाद साधू लागले हे नसे थोडके. ' ती गेली तेव्हा रिमझिम', 'भय इथले संपत नाही', 'घन कंप मयुरा', 'घर थकलेले संन्यासी', याच संग्रहातले 'वाऱ्याने हलते रान' या कविताच आहेत. पुढे संगीताचे कोंदण लाभल्यावर ती गाणी झाली. हृदयनाथांप्रमाणेच पं यशवंत देव यांनी याच संग्रहातले 'पाऊस कधीचा पडतो' या कवितेला सुंदर चाल लावली आहे. त्याचप्रमाणे याच संग्रहातली 'तुला पाहिले नदीच्या किनारी'. याही कवितेचे सुंदर गाणे झाले. हे गाणे सुरेश वाडकर यांनी गायले आणि संगीतकार श्रीधर फडके यांनी स्वरबद्ध केले आहे.

कवी ग्रेस यांच्यावर एक सर्वसाधारण आरोप केला जातो की ग्रेसांची कविता कमालीची दुर्बोध आहे. त्याचे आकलन काही केल्या होत नाही. यावर ज्येष्ठ कवी, समीक्षक डॉ वसंत पाटणकर एके ठिकाणी म्हणतात की”ग्रेस यांच्या कवितेचे आवाहन विशिष्ट प्रकारच्या वाचकवर्गाला बऱ्यापैकी आहे. या आवाहनाचे एक महत्वाचे कारण म्हणजे ग्रेस यांच्या कवितेतील संमोहक स्वरूपाची नादमयता, लयबद्धता हे आहे. या प्रकारची नजाकत निर्माण करण्याची ग्रेस यांची क्षमता खरोखरच असाधारण स्वरूपाची


आहे. त्यामुळे कवितेचा अर्थ कळों वा न कळों, या नादमयतेमुळे अनेक रसिक या कवितेकडे आकर्षित होतात असा सर्वसाधारण अनुभव आहे. अजून एक कारण म्हणजे ग्रेस यांची कविता रोमँटिक आणि संस्कृतप्रचुर शब्दकळेची आहे. त्यामुळे ही कविता अनेकांना आवाहन करताना दिसते.”

'संध्याकाळच्या कविता' या संग्रहानंतर ग्रेस यांचे राजपुत्र आणि डार्लिंग (१९७४), चंद्रमाधवीचे प्रदेश (१९७७), सांध्यपर्वातील वैष्णवी (१९९५), आणि सांजभयाच्या साजणी (२००६) हे कविता संग्रह प्रकाशित झाले. हेही संग्रह मी हुडकून वाचून काढले. मात्र संध्याकाळच्या कवितेचे गारुड काही वेगळेच होते. या पहिल्याच संग्रहाद्वारे कवी ग्रेस यांनी 'वेगळ्या शैलीत लिहिणारा कवी' अशी आपली वेगळी ओळख साहित्यविश्वाला दिली हे मात्र नक्की. संग्रहातील कविता वाचताना या कवितेसारखी आपली अवस्था होतेच.

या व्याकुळ संध्यासमयी, शब्दांचा जीव वितळतो
डोळयात कुणाच्या क्षितिजे.. मी अपुले हात उजळतो.!

(संध्याकाळच्या कविता (कविता संग्रह), ग्रेस, पॉप्युलर, मुंबई)

# 7. महानंदा: होरपळलेल्या दोन जीवांची कहाणी




*मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश*
*माझ्याकडे देव माझा पाहतो आहे*

*जन्मजन्मांचा हा योगी, संसारी आनंद भोगी*
*विरागी, की म्हणू भोगी?*
*शैलसुतासंगे गंगा मस्तकी वाहे*
*माझ्याकडे देव माझा पाहतो आहे!*

वाचक मित्रांनो... हे गाणं आठवतंय ना? सुप्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांच्या सुरेल आवाजातले हे गाजलेले गीत. १९८४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'महानंदा' या चित्रपटातले हे गीत. शब्द अर्थातच कवयित्री, गीतकार शांताबाई शेळके यांचे आणि त्यांच्या शब्दांना स्वरसाज चढवला आहे तो प्रतिभाशाली संगीतकार पं हृदयनाथ मंगेशकर यांनी. चित्रपटाची सुरवातच या गीताने होते आणि आपण अलगद, तरंगत गोव्याच्या निसर्गरम्य परिसरात कधी जावून पोहोचतो ते समजतच नाही. हा चित्रपट पाहून मी पुरता वेडावून गेलो होतो. नुकतेच महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून मी नोकरीच्या शोधात होतो. हा चित्रपट पाहण्यापूर्वी आमच्या कॉलेजच्या लायब्ररीत ती कादंबरी मी झपाटल्यासारखी वाचली होती. सिद्धहस्त लेखक, नाटककार, जयवंत दळवी (१९२५ ते १९९४) यांच्या लेखणीतून साकारलेली एक अजरामर साहित्यकृती. 'महानंदा' होय.. महानंदा. ही कादंबरी वाचल्यामुळे चित्रपटाचा आनंद घेऊ शकलो. तरीही ज्या मूळ कादंबरीवरून हा चित्रपट साकारला होता ती महानंदा कादंबरी चित्रपटापेक्षा मला जास्त भावली. कारण जयवंत दळवी यांच्या लेखनशैलीतून त्याकाळचे वातावरण, तो निसर्ग, त्या व्यक्तिरेखा, ती असोशी, नातेसंबंधांची फरफट इतकी सुरेख आणि नेमकी रेखाटली आहे की कादंबरी वाचताना आपल्या नजरेसमोरच ते नाट्य घडते आहे, त्या

व्यक्तिरेखा आपणाशी संवाद करीत आहेत अशी विलक्षण अनुभूती मला मिळाली होती. दळवींनी उभ्या केलेल्या अदभूत विश्वातून बाहेर पडण्यास मला खूप वेळ लागला हे नक्की.

सिद्धहस्त लेखक जयवंत दळवी यांची 'महानंदा' ही लघुकादंबरी मार्च १९७० मध्ये मॅजेस्टिक प्रकाशनने प्रकाशित केली. त्यास वाचक रसिकांचा अभूतपूर्व असा प्रतिसाद लाभल्याने गेल्या काही वर्षात या कादंबरीच्या चक्क दहाच्यावर आवृत्त्या प्रकाशित झाल्या. एका सकस, अभिजात कादंबरीच्या नशिबी किती छान योग येतो ते पहा. १९८४ मध्ये याच कादंबरीवर आधारित मराठी चित्रपट तर १९८७ मध्ये हिंदी चित्रपट प्रकाशित झाला. या दोन्ही चित्रपटांना अलोट प्रतिसाद लाभला. त्यापूर्वी साहित्यिक, नाटककार शं. ना. नवरे तर या कादंबरीच्या प्रेमात पडून त्याचे चक्क नाट्यरूपांतर केले. त्यांनी साकारलेल्या नाटकाचे नाव होते 'गुंतता हृदय हे'. हे नाटक कादंबरीनंतर लगेच चार वर्षांनी म्हणजे १९७४ मध्ये प्रथम रंगमंचावर आले. त्याही नाटकास नाट्यरसिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. प्रारंभीच्या काही प्रयोगात डॉ काशिनाथ घाणेकर आणि आशा काळे यांनी साकारलेली भूमिका सर्वांच्या स्मरणात नक्कीच असेल. २०१८ पर्यंत वेगवेगळया कलावंतांच्या संचात त्याचे प्रयोग होत होते. लेखक, नाटककार जयवंत दळवी यांच्या अनेक लेखनाचा प्रवास प्रथम

कथा... कादंबरी... नाटक आणि नंतर चित्रपट असा झाला आहे. इतर लेखकांच्या नशिबी हा योग दुर्मिळच. त्यामानाने जयवंत दळवी खरोखरच भाग्यवान.

वाचक रसिकांनो.. आयुष्याच्या वेगवेगळया टप्पावर कधीनाकधी दळवींची ही अजरामर कलाकृती वाचण्याचा किंवा पाहण्याचा योग नक्कीच आला असेल. तरीही याची कहाणी अगदी थोडक्यात सांगतो. प्रथम दळवींच्याच लेखणीतून उतरलेल्या कादंबरीतील एका भागाची झलक देतो म्हणजे आपणास अंदाज येईल.

"खरं म्हणजे मामांना ओढ लावणारी कल्याणी वाईट की मामांना ओढ न लावू शकणारी मामी वाईट? सर्वांच्या दृष्टीनं कल्याणी वाईट! आणि मामी बरी! कारण, कल्याणी भावीण! आणि मामी मामांची लग्नाची बायको! वास्तविक स्वच्छ मनानं विचार केला तर कल्याणीबद्दल सर्वांना सहानुभूती वाटायला हवी. आपल्या समाजानं आपल्या सुखासाठी देवाचं निमित्त करून निर्माण केलेली भाविणीची संस्था! त्यात बळी कल्याणीच, तिनं केवळ तिची आई भावीण न देवाला वाहून घ्यायचं. स्वतः लग्न करायचं नाही, जो खोत पैसा देईल, सांभाळ करील, त्याच्या मनासारखं आणि लहरीसारखं वागायचं."

'बाबुल' हा मुंबईमधील कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी करतोय. बऱ्याच वर्षांनी अगदी सहजपणे गोव्याच्या निसर्गरम्य ठिकाणी राहणाऱ्या मामा-मामींकडे सुट्टीमध्ये राहावयास येतो. गावातल्याच रवळनाथाच्या देवळात बाबुलची सहजपणे गाठ पडते कल्याणीशी. कल्याणी बाबुलला ओळखते. देवाची सेवा करणारी भावीण कल्याणी साऱ्या गावाला ठावूक आणि सारा गाव देखील या भाविणीला पुरता ओळखून असतो. हळूहळू बाबुलला सारे कळू लागते. आपल्या मामांचे आणि भाविणीचे संबंध काय आहेत हेही कळून चुकते. मामीला हे सारे माहिती असते, ती आतल्याआत फक्त जळत असते, रोज विझत असते. अशाच वेळी बाबुलची गाठ पडते कल्याणीच्या मुलीशी म्हणजेच मानूशी. मानू म्हणजेच महानंदा. मानूच्या सौंदर्यामुळे बाबूल पुरता घायाळ होतो. लग्न करीन तर फक्त महानंदाशीच असा निर्धार करीत असतानाच कल्याणीला हे लग्नबिग्न अजिबात मान्य नसते. कारण भाविणीने फक्त देवाचीच सेवा करायची असते, लग्न वगैरे केल्यास देवाचा कोप होईल, मोठे अरिष्ट येईल असे तिला वाटत असते. त्यामुळे तिची परवानगी मिळणार नसल्याने पळून जावून लग्न केल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय बाबूल पाशी उरत नाही. मानूला विश्वासात घेऊन तसे तिला वचन देऊन बाबूल मुंबईला परततो. मुंबईहून बाबूल मानूला पत्रं पाठवतो की अमुक तमुक दिवशी मी तुला


नेण्यास येईल तेव्हा तू तयार रहा. मात्र ही सारी पत्रे गावातला लंपट पोस्टमास्तर मध्येच ती लंपास करून कल्याणीला दाखवतो. ती ताबडतोब मानूला परगावी पाठवून देते. इकडे बाबुल गावी मानूच्या घरी येतो. कल्याणी त्याला भलतेच काही सांगते. 'तिला पाचवा महिना लागला आहे, आम्ही भाविणी. जो आसरा देतो त्यालाच आम्ही सेवा देतो. तेव्हा तू तिला विसर. मला भेटू नकोस असे तिने स्पष्ट मला सांगितले आहे. असे कल्याणींने सांगितल्यावर बाबूल पुरता कोसळतो. मानूने आपल्याला फसवले असे वाटून त्याचा जगण्यातला सारा रसच संपतो.. मुंबईत लग्नासाठी आई बाबूलपाशी हट्ट करते मात्र बाबूल लग्न करीत नाही. पश्चातापाच्या आगीमध्ये तो जळत असतो. बरीच वर्षे जातात. इकडे गावातले मामा वारतात. मामीला भेटायला बाबुल गावी जातो. आणि... एका अवचित वळणावर त्याची गाठ पडते महानंदाशी. एव्हाना कल्याणीला पुरते वेड लागले असते. थकलेली मानू सारे सत्य बाबुलला कथन करते. बाबूल निःशब्द होतो. दोघांच्या जीवाची फसवणूक, फरफट करणाऱ्या कल्याणीला चांगलीच शिक्षा मिळालेली असते. पुढे काय होते? मानूला झालेली मुलगी.. ती कोणाची असते? महानंदा आणि बाबुलचे लग्न होते का? बाबूल कोणता निर्णय घेतो? याची सारी उत्तरे या कादंबरीच्या उत्तरार्धात मिळू शकतील.

रूढी, परंपरेच्या जोखडात कोमेजलेल्या आणि पुढे सामाजिक बंधनात जखडून गेलेल्या, होरपळलेल्या दोन प्रेमी जीवांची विलक्षण हुरहूर लावणारी ही कहाणी वाचकाला अंतर्मुख करते. अगदी आत्ताआत्तापर्यंत कर्नाटक, गोवा आणि दक्षिण कोकणात गावातल्या काही देवळांभोवती देवदासींची प्रथा अस्तित्वात होती. देवदासी म्हणजे विशिष्ट देवाला वाहिलेल्या मुली. देवाच्या सेवेच्या नावाखाली या मुलींचे लैंगिक शोषण होत असे. आणि त्यामध्ये गावातली अनेक प्रतिष्ठित मंडळीं गुंतलेली असत. देवदासींना लग्न करण्यास परवानगी नसे. पुढे देवदासींचे दोन गट पडले. कलावंतिणी वा नायकिणी आणि भाविणी. ही अनिष्ट प्रथा थांबवण्यासाठी अनेक राज्यांनी विविध कायदे केले. तरीही देवदासी संस्था आज पूर्णपणे नामशेष झाली आहे असे खात्रीने म्हणता येणार नाही.

सिद्धहस्त लेखक जयवंत दळवी यांनी त्या काळातला हा ज्वलंत विषय निवडून त्याभोवती कथा गुंफून महानंदा ही अजरामर साहित्यकृती निर्माण केली त्यास खरोखरच तोड नाही. वाचक रसिकांच्या विस्मरणात गेलेली ही कादंबरी आजच्या घडीला पुन्हा एकवार वाचावी अशीच आहे.

(महानंदा (कादंबरी), जयवंत दळवी, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई)

# 8** स्मरणगंध, रानातल्या कवितांचा **




झाडे झाली हिरवीशी शीळ घुमते रानात
ओळ जांभळ्या मेघांची वाहे नदीच्या पाण्यात.

वाट झुंजूमुंजू होते पीक मावेना शेतात
लक्ष पाखरांचे थवे खेळ मांडती पाण्यात.

गळे नभ असावध खेडे पाण्यात बुडून
लांबणीच्या तारांवर चिंब चिंब थेंबऊन

स्वच्छ पावसाळी हवा तसे बेहोष उधाण
दाट हिरव्या गर्दीत पाय गेले बहकून.

माझे गाव ओसरगाव, जिल्हा सिंधुदुर्ग. अगदी शालेय जीवनापासून दरवर्षी न चुकता आई-वडिलांबरोबर गावी जाण्याचा शिरस्ता. रायगड, रत्नागिरी जिल्हा काहीप्रमाणात उजाड आणि रुक्ष होण्याच्या वाटेवर असला तरी अजूनही सिंधुदुर्ग जिल्ह्यात बऱ्यापैकी वनराई टिकून आहे, समृद्ध अरण्याने व्यापलेला हिरवागार प्रदेश अजूनही डोळ्यांना सुखावतो. काही जंगले तर अजूनही अस्पर्शित आहेत. माणसांचा पायराव देखील काही ठिकाणी नाही. चित्रकाराची दृष्टी असल्याने निसर्गाच्या प्रत्येक चौकटीत मी माझ्या पॅलेट मधले रंग शोधायचो. मात्र... मात्र... शब्द काही सापडत नव्हते. इथला नग्न, मूक, ओला, राजस निसर्ग मला हाकारे पुकारे घालतो आहे असा भास नित्य होत असे. मुंबईच्या रुक्ष वातावरणात जगण्यासाठी हातपाय मारताना, लोकल मध्ये लटकताना खिडकीबाहेर झपाट्याने मागे पडणारे एखादे हिरवे

ओले झाड देखील मनाला आधार देऊन जायचे. ते दिवस... शालेय आणि पुढे महाविद्यालयीन काळात बालकवी, बोरकर, इंदिराबाई, ना. घ. आणि पुढे पाडगावकर यांच्या अनेक निसर्गकविता मी वाचल्या होत्या, काही पाठही केल्या होत्या. मात्र... मात्र ती.. ती पावसात भिजण्याची अनुभूती काही मिळत नव्हती. अगदी थोडक्यात मी अजिबात समाधानी नव्हतो. ते ओले रंग अगदी सहज पणे कागदावर रेखाटायचो, पण.. शब्दांच्या चिमटीतून ते रंग निसटून जायचे अगदी बेमालूमपणे! आणि.. अश्याच एका बेसावध क्षणी १९८०-८१ च्या सुमारास कवी ना. धो. महानोर यांचा’’रानातल्या कविता' हा कविता संग्रह हाती आला. तेव्हा मी बारावीत होतो. कविता संग्रह अगदी एका बैठकीतच वाचून काढला. हे काहीतरी विलक्षण आहे, नग्न आहे, स्वच्छ आहे, नितळ आहे अगदी झऱ्यातल्या अवखळ पाण्यासारखे. मला त्या दिवशी महानोरांच्या कवितांना रंग, रूप, गंध, स्पर्श सर्व काही आहे याचा साक्षात्कार झाला. मी विलक्षण प्रभावित झालो. शब्दांच्या चिमटीतून निसटलेले रंग अलगद माझ्या कॅनव्हास वर येऊन बसले. सर्वात महत्वाचे बालपणी पाहिलेला गावाकडचा निसर्ग पुन्हा नव्याने मला भिडू लागला, त्यातील विविध प्रतिमांसह, जाणीवांसह आणि संवेदनासह!

महानोरांची ही शुद्ध आणि शुचिर्भूत कविता आहे. या कविता म्हणजेच तरारलेली झाडं आहेत, पांढराशुभ्र झरा आहे आणि निरभ्र नभ आहे आणि या निसर्गात वावरणारी काही माणसं देखील आहेत, पाखरंही आहेत. काहीजण आपल्याशी संवाद साधतात तर काही स्वतःला मिटून घेतात, कायमचे. रानातल्या कविता या संग्रहाच्या अगदी प्रारंभीच एक कविता आपले लक्ष वेधून घेते.

ह्या शेताने लळा लाविला असा की
सुखदुःखाला परस्परांशी हसलो-रडलो
आता तर हा जीवच अवघा असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो!

कवी ना. धो. महानोर यांचे गाव पळसखेडे. जिल्हा-औरंगाबाद. जगविख्यात अजिंठा लेण्यांचा सहवास लाभलेले एक छोटेसे खेडे. रानातल्या कविता संग्रहातील कवितांची निर्मिती ही १९६० ते १९६६ दरम्यानची. म्हणजे माझा तेव्हा जन्म देखील झाला नव्हता. त्यानंतर या कविता पुढे १९६७ ते १९७० या कालावधीत सत्यकथा, प्रतिष्ठान सारख्या अतिशय दर्जेदार आणि चोखंदळ मासिकात छापून आलेल्या. या एकत्रित कवितांचा संग्रह १९६७ मध्ये पॉप्युलर प्रकाशन संस्थेने काढला. या संग्रहाला ज्येष्ठ

समीक्षक डॉ विजया राजाध्यक्ष यांची तब्बल अठ्ठेचाळीस पानांची दीर्घ प्रस्तावना लाभली आहे.

गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुनी बेहोष होता
शब्दगंधे, तू मला बाहुत घ्यावे!

महानोरांचे या रानावर विलक्षण असे प्रेम आहे. भूमी आणि नभाचे जसे अतूट, अक्षय नाते असते अगदी तसेच.! रान आणि महानोर वेगळे करणे शक्यच नाही. रानात त्यांचा जीव घुटमळतो, तिथेच त्यांचे ध्यानही लागते आणि साक्षात्कार देखील होतो. महानोरांचा प्राण या रानात गुंतून राहतो. रानातली फाटकी झोपडी हीच त्यांचे काळीज बनते. एक अनोखे असे भावविश्व निर्माण होते, महानोरांचे आणि वाचकाचे देखील डोळे भरून येतात. आणि.. अगदी याच क्षणी महानोरांची लेखणी सरसावते आणि ती कागदावर शब्दचित्र रेखाटण्यास सिद्ध होते.

महानोरांची कविता म्हणजे पहाटेच्या प्रसन्न वेळी निसर्गाला पडलेलं एक सुंदर स्वप्नच आहे. प्रत्येक कवितेत नाद आणि लय यांचे सुरेख मिश्रण आपणास प्रत्ययाला येते. महानोरांच्या कवितेत

कुठे भव्यता नाही, गूढता नाही किंवा कुठलीही कृत्रिमता नाही. त्यांच्या शब्दांना लाभलाय अस्सल खान्देशी मातीचा गंध, रूप, रस आणि स्पर्श सुद्धा! महानोर हे शेतकरी. मातीचा हुंकार, रुजलेल्या बियांचे कोवळेपण, आभाळातले रंग, झाडांच्या सावल्या, निष्पाप झऱ्याची चंचलता, नदीकाठची आतुरता हे सारं सारं वैभव अगदी सहजपणे आपल्या बोलीभाषेत महानोरांनी कागदावर उमटवले. शब्दांची, भावनांची, प्रतिमांची कुठेही ओढाताण नाही. एखाद्या साध्या दृश्यातला निरागसपणा ते कवितेत अगदी सहजपणे ते लिहून जातात.

हिरव्या पानात पानात काही चावळ चालते
भर ज्वानीतली ज्वार अंग मोडीत बोलते
शेत गव्हाचे पिवळे जरा नशेत झुलते
आणि साळीचे उगाच अंग शहारून येते
पोटऱ्यातल्या गव्हाचे हसू ओंब्यांत दाटते
केळ कातीव रूपाची छाया पाण्यात शोधते

१९७६-७७ च्या सुमारास रानातल्या कविता संग्रहातील कवितांचा रानगंध थेट मंगेशकरांच्या प्रभुकुंज इथे अगदी सहजपणे पोहचला, दरवळला. महानोर हे खानदेशातले लतादीदी, हृदयनाथ

यांचेही आजोळ खानदेशातले! अगदी अवचितपणे पं. हृदयनाथ मंगेशकर आणि महानोरांचे सूर कोठेतरी जुळले आणि साकारले एक विलक्षण शब्दसुरांचे अनोखे विश्व. महानोरांच्या शब्दांना अदभूत सुरांचे कोंदण लाभले. १९७७ मध्ये 'जैत रे जैत हा चित्रपट प्रदर्शित झाला. दुर्गमहर्षी गो. नी. दांडेकरांच्या एका कादंबरीवर तो चित्रपट साकारला होता. चित्रपट काही चालला नाही मात्र त्यातली सर्वच्या सर्व गाणी तुफान लोकप्रिय झाली. महानोर एकदम प्रकाशझोतात आले. मी रात टाकली, जांभूळ पिकल्या झाडाखाली, नभ उतरू आलं, आम्ही ठाकर ठाकर ही गाणी रसिकांच्या आजही हृदयात नांदत आहेत. लोकगीतांचा लहेजा रसिकांना भारावून गेला. तो एक वेगळा प्रयोग होता. पुढे महानोरांनी लिहिलेल्या 'आजोळची गाणी' या अल्बम मधील गाणी देखील तितकीच गाजली. या सर्व गाण्यांचा गाभा या रानातल्या कविता संग्रहात दडला होता. महानोरांना तो दिसला आणि त्याचे सोने झाले.


प्रसन्नतेचा शिडकाव करण्याऱ्या कवितांबरोबरच मनाला काही अस्वस्थ करणाऱ्या प्रतिमाही महानोरांनी संग्रहात ताकदीने रेखाटल्या आहेत. दुष्काळ, स्त्रीच्या वेदना, झाडांच्या जखमा, एकटेपण, विस्कटलेली संध्याकाळ, ग्रीष्माचे ऊन, वैराण माळरान, उदास खेडे अशा आशयाच्या कविता वाचकांना अंतर्मुख करतात.

जन्मापासूनच दुःख जन्मभर असे
जन्मभर राहो, मला त्याचे न फारसे
साऱ्यांसाठी झाले उभ्या देहाचे सरण
सगेसोयरेही कधी जातात दुरून,
फुले वेचताना सुद्धा ओथंबले मन
जन्माचेच ओझे पोटी घट्ट लपेटून
डोळे गच्च अंधारून. तेव्हा माझे रान
रानातली झाडे मला फुले अंथरूण.

मुंबईच्या अखंड धावपळीत, गर्दीत स्वतःला निमूटपणे स्वाधीन करण्यापूर्वी महानोरांच्या कविता, गाणी जणू मला प्राणवायू पुरवतात आणि मी पुन्हा ताजातवाना होतो, शुद्ध होतो, जगण्यासाठी सिद्ध होतो.''मीच माझा एककल्ली एकटा चालीत गेलो, आडवाटेने पिसाटाच्यापरी बेहोष झालो.'''रानातल्या कविता' वाचताना आपल्या प्रत्येकाची अशी अवस्था होतेच.!

(रानातल्या कविता (कविता संग्रह), कवी ना धों महानोर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई)

# 9. *** गारंबीचा बापू ***




"गारंबीने आपला चिमुकला संसार डोंगराच्या एका पाखेवर थाटला आहे. बुरोंडी, बिवळापांजरी, दुर्गेश्वर या गावांचे संसारही याच डोंगराच्या कुशीत आहेत. बुरोंडीशी तो अगदी समुद्राला जाऊन भिडला आहे, तेथून उगवतकडे सरकू लागतो, जिथं त्यानं

गारंबीला आश्रय दिला आहे, ते टोक समुद्रापासून चांगलं सात मैल भरतं. या इथं वनदे नदीला किंचित अवसर देऊन पुन्हा त्याचा समुद्राच्या दिशेनं प्रवास सुरु होतो, तो थेट साखरपेंडीपर्यंत. लोक त्याच्या पहिल्या भागाला गारंबीचा नी दुसऱ्या भागाला पिऱ्याचा डोंगर म्हणतात. गारंबीचा डोंगर, पिऱ्याचा डोंगर आणि अरबी समुद्र यांनी वेष्ठिलेला एक विस्तीर्ण त्रिकोण बनला आहे, त्यात गारंबीला मध्यबिंदूचं स्थान मिळालं आहे. निसर्गाच्या गारंबीला हे जे मानाचं स्थान दिलं आहे, ते गारंबीकडे एकवार नजर टाकली की अगदी यथार्थ वाटतं.!"

कोकणातल्या हर्णे, मुरुड, आंजर्ले आणि मुर्डी या बंदरपट्ट्यातील गावे आणि वरच्या अंगाला वसलेलं हिरवंगार दापोली. या निसर्गरम्य परिसरात घडलेली एका आगळ्यावेगळ्या अचाट व अफाट बापूची हृदयस्पर्शी कहाणी. 'गारंबीचा बापू'. १९५२ साली प्रकाशित झालेली ही कादंबरी. तब्बल सात दशकांचा काळ लोटलाय परंतु त्या बापूची विलक्षण प्रेमकहाणी, त्या निसर्गरम्य गारंबीचे अनेक तपशील, संदर्भ, तसेच चटका लावणाऱ्या अनेक व्यक्तिरेखा काही केल्या मनातून निसटून जात नाहीत त्या आपल्या तनमनावर गारुड करतात. याचे सारे श्रेय जाते ते मराठी साहित्य विश्वाला एक वेगळाच आयाम देणाऱ्या सशक्त लेखकाला म्हणजेच श्री ना पेंडसे यांना.! या कादंबरीत पेंडश्यांनी

रेखाटलेल्या सर्व व्यक्तिरेखा जरी काल्पनिक असल्या तरीही त्या जिवंत वाटतात, आपल्या मनाला भिडतात आणि संवाद साधतात. कादंबरीचे लेखक श्री ना पेंडसे यांचा जन्म याच दापोली तालुक्यातल्या मुर्डी गावातला (१९१३). वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत लेखकाचे या परिसरात वास्तव्य होते. इथला निसर्ग, खाडी, समुद्र, देव, माणसं, चालीरीती, संस्कृती ई सारं काहीसं मनाला थेट भिडणारं संचित काळजात खोलवर जपून ठेवलेलं. पुढे नोकरीच्या निमित्ताने मुंबईत वास्तव्य. पेंडश्यांची पहिली कादंबरी प्रकाशित झाली तीच मुळी त्यांच्या वयाच्या छत्तिसाव्या वर्षी! पुढे चार वर्षानंतर गारंबीच्या निसर्गरम्य गावात कधी काळी स्मरलेला, अस्पष्ट दिसलेला बापू पेंडश्यांनी अक्षरशः ताकदीने कागदावर रेखाटला आणि पुढे इतिहास घडला. 'गारंबीचा बापू' न वाचलेला मराठी रसिक सापडणे दुर्मिळच. त्या काळात या कादंबरीने अनेक वाचक रसिकांना अस्वस्थ करून सोडले होते. कित्येकांनीं तर या कादंबरीची पारायणं केली. साठ-सत्तर वर्षांपूर्वीच्या ‘गारंबीच्या बापू’ ची मोहिनी आजच्या पिढीवर देखील तितकीच टिकून आहे हे विशेष.!

बापू अंतर्बाह्य कसा होता याचा छोटासा नमुना श्रीनांच्याच शब्दात.

"बापू माणसं जोडताना कुणबी नडला नाही, महार नडला नाही, मुसलमान नडला नाही. वाट्टेल तिथं वाट्टेल ते तो खाई. साखरपेंडीला तो गेला की खुशाल मुसलमानांच्या गळ्यात गळा घालून फिरे. मुसलमानांच्या हॉटेलात बेधडक शिरून मुसलमान मित्रांसमवेत चहा-पावावर हात मारणारा त्या काळात त्या पट्ट्यात बापू शिवाय दुसरा कोणी नव्हता. आणि सांगे पुन्हा वाटेल त्याच्या तोंडावर. त्याचं पण काही नाही. गारंबीला त्याला कोणी 'ब्राह्मण' म्हणून जेवायला बोलावीत नसे. बापू म्हणे"गेले उडत!"कोणी बोलावीत नाही याची खंत तर नाहीच वाटली पण समाराधनेचं गावबोलावणं असलं, तरी तो कधी गेला नाही. याला अपवाद फक्त व्याघ्रेश्वराच्या उत्सवाचा.!"

असा हा बापू. आगळावेगळा. जातीव्यवस्था झुगारून देणारा, चांगल्याशी चांगला आणि वाईटांशी तितकाच वाईट वागणारा मनस्वी, स्वच्छ आणि निष्कपट मनाचा बापू मला खऱ्या अर्थाने भिडला, समजला तो माझ्या महाविद्यालयीन काळात. ही कादंबरी मी झपाट्याने वाचून काढली. कोकणातल्या मातीशी घट्ट ऋणानुबंध असल्याने बापू ही व्यक्तिरेखा मला विलक्षण वाटली. पन्नास वर्षांपूर्वीच्या कादंबरीतल्या बापूची बंडखोर व्यक्तिरेखा ही मला काळाच्या खूप पुढची वाटली. श्रीनांच्या अलौकिक प्रतिभेचा तो एक आविष्कारच होता.

निसर्गरम्य कोकणातल्या गारंबी या गावात यशोदा आणि विठोबाच्या पोटी अतिशय गरीब अशा कुटूंबात बापूचा जन्म होतो. विठोबा अतिशय साधाभोळा, दारिद्र्याने पुरता गांजलेला, खंगलेला. प्रसंगी उपाशी राहणारा. मात्र केवळ बापूसाठी आपल्या तोंडातला घास काढून बापूला भरवणारा गरीब विठोबा. हा विठोबा अण्णा खोतांच्या घरी पाणक्या म्हणून अतिप्रामाणिकपणे काम करणारा.''विठोबा.. एक दिवस तुझा हा बापू या गावचा मोठा माणूस होणार. तेव्हा ही सर्व कामे बंद करायची''बापू त्याला हे नेहमी सांगे. मात्र बापूचे आपल्या आईशी काही जमत नसे. कारण ती अण्णा खोत याचे सैदव गुणगान गायची. बापू मनस्वी, जातपात न मानणारा. गुरववाड्यात त्याचं येणंजाणं, उठणंबसणं असल्याने समस्त ब्राह्मण समाजाचा बापूवर रोष. मात्र बापूला त्याची फिकीरच नसते. काही वेगवेगळया कारणांमुळे, मतभेदांमुळे बापू आणि अण्णा खोत यांच्यात वितुष्ट येते. पुढे तर ते एकमेकांचे पक्के वैरी बनतात. याचा फायदा घेऊन गुरव वाड्यात राहणाऱ्या गरीब यमीला दिवस बापूपासून गेलेत याचा कांगावा खोत गावभर करतात. अख्खा गाव बापूच्या विरोधात उभा राहतो. अण्णा खोत मात्र साळसूदपणे पंचायतीत दंड भरून बापूला सोडवल्याचे नाटक करतात. उपकार केल्याचे भासवतात. बापूला मात्र सर्व काही समजते. बापूला अख्या गावाचा वीट येऊन तो पुलाजवळील

रावजींच्या खानावळीत नोकरी पत्करतो. रावजींची तब्येत त्याला साथ देत नसते. बापू खानावळीत अगदी मनापासून राबतो आणि खानावळीचा बरकत येते. रावजी खुश होतो. याच कालावधीत रावजींची मुलगी राधा हिला बापूचा रोखठोक आणि स्वच्छ स्वभाव आवडतो. बापूलाही राधा आवडू लागते. मात्र अचानक बापूचे वडील विठोबा याचे निधन होते. बापूचे मायेचे कोणीच उरत नाही. बापूने विठोबाला मोठा माणूस होण्याचे वचन दिलेले असते. खानावळीत राहिलो तर ते वचन पूर्ण होणार नाही म्हणून एकेदिवशी बापू खानावळ सोडतो, गाव सोडतो आणि दूरवर मुसा काजी या मुसलमान व्यापाऱ्याकडे पडेल ते काम करतो. बापूची हुशारी मुसाला कळते. व्यापाराचे सर्व अंग बापू समजून घेतो. काही वर्षे जातात आणि.. आणि.. एके दिवशी बापू स्वतःचा व्यवसाय चालू करतो. प्रचंड फायदा कमावतो, श्रीमंत होतो, मोठा माणूस होतो. तर इकडे खानावळीचा मालक रावजी मरण पावतो. राधा ही बापूपेक्षा वयाने मोठी असते. बापू राधेचा स्वीकार करतो. बापू राधेला घेऊन गारंबीत संसार थाटतो. घर बांधतो. गावात शाळा, दवाखाना काढतो. अनेकजणांना बापू मदत करतो. अण्णा खोतांना मात्र बापूचे हे सुखाचे दिवस बघवत नाहीत. ते त्याला त्रास देण्यास सुरवात करतात. मात्र राधा ही बापूला समजावते, त्याला आधार देते.

आता बापूला गावचा सरपंच होण्याचे वेध लागतात. एकदा सरपंच झाल्यावर या अण्णा खोताला आपण संपवून टाकू याचा त्याला विश्वास असतो. मात्र राधा बापूला तसे न करण्यासाठी खूप समजावते. तरीही हट्टापोटी बापू सरपंचासाठी उभा राहतो. अण्णा खोत देखील बापूला त्रास देण्यासाठी सज्ज होतात. आणि.. आणि.. एका वेगळ्याच वळणावर कादंबरी आपल्याला नेऊन सोडते. तिथल्या विचित्र, गहिऱ्या नातेसंबंधांच्या भोवऱ्यात वाचक गरगरत राहतो.

बापूची आई गारंबीला परतते. तिची जगण्याची आस संपलेली असते. डोळे मिटण्यापूर्वी तिला बापूला काही सांगायचं असतं. एक प्रखर सत्य. ते एकदा बापूला सांगितलं की तिला कायमचा मोक्ष लाभणार असतो. ते.. ते सत्य कोणते? ते सत्य सांगितल्यावर बापू एखाद्या वृक्षासारखा उन्मळून का पडतो? बापूने जीवनाची लढाई स्वकर्तुत्वाने जिंकलेली असते. मात्र आपल्या आईचे बोल ऐकल्यावर बापूची एखाद्या पराभूतासारखी अवस्था का होते? याची सारी उत्तरे आपल्याला या कादंबरीत गवसतील.

१९६५ मध्ये रंगभूमीवर या कादंबरीवर आधारित नाटक आले आणि १९७७ मध्ये चित्रपट देखील. दोन्हीही लोकप्रिय झाले आणि दोन्ही कलाकृतीत डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी सहजसुंदर

अभिनय केला होता. इतकेच काय या कादंबरीचा हिंदी आणि इंग्रजीमध्ये अनुवादही प्रकाशित झाला. पेंडश्यांनी उभा केलेला अफाट आणि बेफाम वृत्तीचा बापू काही केल्या माझ्या मनातून जात नाही. अजूनही.!

(गारंबीचा बापू (कादंबरी), श्री ना पेंडसे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे)

# 10 ** खानोलकरांची 'चानी' **




“मला आश्चर्य वाटत होतं. एका चानीला उध्वस्त करण्यासाठी उभा गाव देवळात उभा राहतो. देवीची प्रार्थना भाकतो. पण चानीला देवी कशी काय उध्वस्त करील? तिनेच तर चिठ्ठी दिली असती की चानीला राजपुत्र मिळेल. चानी खरोखरच पापी असती तर देवीने अशी चिठ्ठी दिली असती का? माझ्या अंगावर काटा उभा राहत होता. मला मनापासून वाटत होते, की धावत धावत जावे आणि चानीला सांगावे की”ताई, तू गाव सोडून निघून जा. तुला लोक मारतीलसुद्धा”पण एवढ्यातच धाकटा मामा ओरडला,”शांत

रहा, शांत, रहा!"त्याच्या शब्दांना एक विलक्षण धार होती. सगळा समुदाय पडलेल्या वाऱ्यासारखा गप्प झाला. त्या कातरवेळी धाकट्या मामाने सभागृहात फेकलेले शब्द गंभीर तर होतेच, पण त्या शब्दांमागे वादळापूर्वीची शांतता दाटली होती. त्याने चानीवर पाळत ठेवली होती. आज बरेच दिवस तो चानीच्या पाठीवर होता. राजपुत्राच्या स्वप्नात रंगलेली चानी आज अचानकपणे धाकट्या मामाच्या हाती सापडली होती. मलाही त्याची कल्पना नव्हती. चानी देवाच्या गाभाऱ्यात उभी होती. मलाही हे माहीत नव्हते. पण धाकट्या मामाने तिला पाहिले होते. तो लोकांना म्हणाला"आज ही पोर देवानंच तुमच्या हाती दिली आहे. आता तुम्हीच ठरवा तिचं काय करायचं ते!"

चिं. त्र्यं. खानोलकर. तळकोकणातल्या लालसर मातीने मराठी साहित्य सृष्टीला दिलेली एक शापित, अलौकिक देणगी. शापित या अर्थाने म्हंटले वयाच्या अवघ्या शेहेचाळीसाव्या वर्षी दुर्धर आजाराने त्यांचे निधन झाले. आज ते हयात असते तर मराठी साहित्य सृष्टीला नवंप्रतिभेची झळाळी नक्कीच लाभली असते. परंतु आपल्या मराठी साहित्याचे दुर्दैव.

खानोलकरांचा जन्म दि. ८ मार्च १९३० रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील बागलांची राई, तेंडोली येथे

झाला. चिंतामण त्र्यंबक खानोलकरांच्या आईंना एकूण अकरा अपत्ये झाली. त्र्यंबक हे सहावे अपत्य. मात्र काही कारणांनी त्र्यंबक यांचा जन्म होऊ नये आणि तो गर्भ आतच नष्ट व्हावा म्हणून कुठलीशी जंगली मुळी उगाळून त्यांच्या आईला देण्यात आली होती. तो भयंकर प्रयोग त्यावेळी झाला होता. तरीही... तरीही.. त्याही परिस्थितीत कोणालाच नको असणाऱ्या त्र्यंबक यांचा जन्म झाला. पुढे खानोलकरांनी ही गोष्ट कळल्यावर त्यांच्या मनावर विलक्षण आघात झाला. ती वेदना, ते दुःख खानोलकरांनी आपल्या विविध प्रकारच्या साहित्यकृतींमध्ये चक्रावून टाकणाऱ्या वेगळ्या शैलीत प्रसवले. कविता, कथा, दीर्घ कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका, संपादन, स्फुटलेखन या वेगवेगळ्या फॉर्ममध्ये खानोलकर व्यक्त होऊ लागले. ते व्यक्त होणं इतकं विलक्षण होतं की मनात साठलेलं कागदावर उतरवल्या खेरीज त्यांना शांती लाभायची नाही. उत्कट प्रतिभेने जणू ते पछाडलेले होते. महत्वाचे म्हणजे जे जे त्यांच्या लेखणीतून बाहेर येत होतं ते सारंच सकस होतं, खूप वेगळं होतं, अभिजात होतं. इतर लेखकांच्या पेक्षा खानोलकरांचे अनुभवविश्व खूप वेगळं होतं. जन्म-मृत्यूतली गूढता, माणसांमधली शारीरिक आणि मानसिक विकृती, अतृप्तता, हिंस्त्रभाव, बुरसटलेलं, खंगलेलं आणि उध्वस्त झालेलं व्यावहारिक जीवन, नियतीचे अदृश्य फटकारे, एकटेपणा,

निसर्गातल्या चित्रविचित्र कल्पना, अनुभूती, उद्रेक, आकस, लैंगिकता असं काहीसं विलक्षण थकवणाऱ्या प्रतिमा खानोकरांच्या साहित्यकृतीतून वाचकाला दिसायच्या. खानोलकरांचे वास्तव्य तळकोकणातले. तिथला रसरशीत, जिवंत आणि प्रत्ययकारी निसर्ग त्यांच्या कवितांमधून देखील कधी डोकवायचा. खानोलकर हे 'आरती प्रभू' या टोपणनावाने कविता लेखन करीत असत.

खानोलकरांच्या साहित्यकृतींची दखल अनेक समीक्षकांनी घेतली. काहींच्या मते ' खानोलकर हे या पृथ्वी ग्रहावरचे वाटतच नाहीत. ते कुठल्याशा परग्रहावरचे भासतात. कारण इतका विलक्षण प्रतिभेचा माणूस या पृथ्वीवर जन्मणे अशक्य वाटते. माझ्या शालेय आणि पुढे महाविद्यालयीन जीवनात आरती प्रभूंच्या अनेक कविता वाचण्यात आल्या. पुढे त्यांची सुंदर गीतेही झाली. पं. हृदयनाथ मंगेशकरांनी अतिशय जाणीवपूर्वक आरतीच्या कवितांना उत्तम चाली लावल्या, त्या जनसामन्यांपर्यंत पोहोचल्या. पुढे तर खानोलकरांचे साहित्य वाचताना माझी अवस्था''आलो होतो हासत मी काही श्वासांसाठी फक्त, दिवसांचे ओझे आता रात्र रात्र शोषी रक्त'' अशी व्हायची.

अशाच वेळी विद्यार्थीदशेत असताना १९७७ मध्ये 'चानी' हा चित्रपट प्रदर्शित झाला. व्ही शांताराम यांनी तो दिग्दर्शित केला

होता. तो मी नंतर पाहिला.. चित्रपट पाहिल्यावर समाधान काही झाले नाही. ती कथा मात्र मनाचा आणि शरीराचा देखील ताबा घेऊ पहात होती. गाणी अर्थात आरती प्रभुंचीच होती. खूप वेगळी, आणि त्याला संगीत देखील पं. हृदयनाथांनी वेगळया बाजेचं दिलेलं. मला माझ्या काही समीक्षक मित्रांनी सांगितले की ज्या मूळ कादंबरीवरून हा चित्रपट काढला ती कादंबरी तू वाच. नंतर आपण त्यावर बोलू. मलाही पटले.

१९७० मध्ये प्रकाशित झालेली चानी ही कादंबरी मी मुळातून वाचली आणि हादरलो. कारण कादंबरीमध्ये गवसलेले संदर्भ, प्रतिमा, कथेचा गाभा, आकृतिबंध मला चित्रपटात काही मिळाला नाही, शोधूनही सापडला नाही. मात्र चानी कादंबरीने मी विलक्षण प्रभावित झालो. नंतर असे कळले की प्रत्यक्ष खानोलकरांनी चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी या चित्रपटाचे काही भाग त्यांना दाखवल्यानंतर त्यांना अत्यंत दुःख झाले, यातना झाल्या. आपण लिहिलेल्या कादंबरीच्या जवळपास देखील हा चित्रपट पोहोचत नाही. ते कुणाशीही बोलले देखील नाहीत. या प्रसंगानंतर त्यांची प्रकृती मात्र झपाट्याने खालावत गेली. यकृताच्या विकाराने ते आजारी पडले, इस्पितळात दाखलही झाले, आणि शेवटी सर्वांना चटका लावून २६ एप्रिल १९७६ (मुंबई) रोजी खानोलकर मराठी साहित्य सृष्टीला अक्षरशः पोरके करून गेले. त्यानंतर नऊ

महिन्यानंतर १ जानेवारी १९७७ रोजी चानी चित्रपट प्रदर्शित झाला मात्र संपूर्ण चित्रपट पाहण्याचे भाग्य खानोलकरांना काही लाभले नाही.

चानी म्हणजे छोटीशी खार. कोकणात तिला चानी म्हणतात. अतिशय चंचल, धांदरट, गरीब स्वभावाची, बोलक्या आणि निष्पाप डोळयांची. कादंबरीतली चानी काहीशी अशीच आहे. निष्पाप! एका अभागी सुंदर मुलीची ही शोकांतिका. अरण्यात लाकडे वेचून खेड्यात विकणाऱ्या एका आदिवासी स्त्रीवर


ब्रिटिश राजवटीतील एक अधिकारी बलात्कार करतो. तिला पुढे गोऱ्या वर्णाची अतिशय सुंदर मुलगी होते. मात्र गावातले लोक त्या स्त्रीला पापी ठरवतात, तिला मारूनही टाकतात. ती सोनेरी केसांची, रूपवान, गोरीपान मुलगी अनाथ होते. मात्र गावाबाहेर राहणार अतिशय राकट असा गंगाराम नावाडी तिला आश्रय देतो. तिला आपली मुलगीच मानतो. ती रानामध्ये, नदीकाठी आणि गावात देखील स्वच्छंद फिरते. स्वप्नातल्या राजकुमाराची ती आतुरतेने वाट पाहत असते. तो माझ्या रूपावर नक्की भाळेल. तो आज जरी नाही आला तरी उद्या नक्की मला घेऊन जाईल अशी तिला खात्री असते. परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच चालले असते. गावातले काही प्रतिष्ठित गावकरी तिला अपशकुनी ठरवतात तर काहींची तिच्यावर वाईट नजर असते. अशाच वेळी

एक लहान मुलगा दिनकर तिला ताई म्हणून हाक मारतो. शापित सौंदर्यवती चानी आणि त्या अश्राप मुलाची चटका लावणारी कहाणी चालू होते. एक गंगाराम आणि दिनकर सोडला तर तिला गावात दुसरे कोणीच नसते. कथा फुलत जाते. समाजातला ढोंगीपणा, निर्लज्यपणा चव्हाट्यावर येतो आणि दुसरीकडे चानीवर पडलेली पुरुषांची वखवखणारी नजर वाचकाला निःशब्द करते, अस्वस्थ करते. छोटे छोटे प्रसंग खानोलकरांनी आपल्या वेगळ्या शब्दशैलीत जबरदस्त रेखाटले आहेत. संपूर्ण गाव अंधश्रद्धेच्या चिखलात रुतून पडलेला. गावातल्या चालीरीती, ढोंगबाजी, नवस, अंगारे, धुपारे अशा गरगरणाऱ्या वर्तुळात शेवटपर्यंत चानी भरडत जाते. तिला थेट आरोपीच्या पिंजऱ्यात ढकलले जाते. पुढे... पुढे... तिला या चक्रातून सोडवायला तो राजकुमार येतो का? दिनकर आणि गंगाराम तिला वाचवतात का? गावातली तालेवार, प्रतिष्ठित मंडळी तिला गावात घेतात का?

अशा साऱ्या प्रश्नांची उत्तरे ' चानी' या अप्रतिम कादंबरीत आपल्याला मिळतात. चित्रपट न पाहता कादंबरी जरूर वाचा. खानोकरांची विलक्षण लेखन शैली साक्षात अनुभवायची असेल तर चानी ला पर्याय नाही.

(चानी (कादंबरी), चिं त्र्यं खानोलकर, मौज प्रकाशन, मुंबई)

# 11. ** अकरा कोटी गॅलन पाणी **




“भद्रपूर कोलफिल्ड म्हणजे जगातलं एक समृद्ध कोलफिल्ड. कुठंही खणा, आधी कोळसा हाती लागणार, मग पाणी. भद्रावती रिव्हर व्हॅलीचा हा भाग खरं म्हणजे एकदम मागासलेला नि मानवी संस्कृती पासून कित्येक योजने लांब असलेला. शंभर सव्वाशे

वर्षांपूर्वी शेड्युल ट्राईब्स आणि अदर बॅकवर्ड कॉम्युनिटीज् चे तेवढं इथं वास्तव्य होते, राज्य होतं. मारलेलं भेकर, नाही तर पकडलेला ससा भाजून खायला त्यांना जंगलात पुरेसं सरपण मिळतं होतं म्हणून त्यांनी जमीन खणून खालचा कोळसा कधी वर काढला नाही. किंबहुना हा काळा दगड चांगला जळतो, हेसुद्धा त्यांना माहित नव्हते. त्यांच्या देवाला, भद्रावती नदीच्या खोऱ्यात गर्द हिरवं जंगल, वेली, फुलं नि गोड पाखरं, उमदी जनावरं तयार करायला किती किती काळ लागला होता ; पण या शहाण्यासुरल्या माणसांनी पाच-दहा वर्षात वनवासी देवाच्या साऱ्या केल्या करवल्यावर बोळा फिरवला. बघता बघता भद्रावतीचं खोरं ओसाड झालं. वनवासी देवाला कोळसा तयार करायला सहा लाख वर्ष लागली, पण तो वर काढून जाळून टाकायला या शहाण्यासुरत्या माणसांना दोन-पाच वर्ष पुरु लागला! कोळसा जाळणारे सोन्याचा धूर काढू लागले. गर्द हिरव्या भद्रावती रिव्हर खोऱ्याचे बघता बघता मातेरे झाले.!”

१९७९ साली प्रदर्शित झालेला अमिताभ बच्चन यांचा एक गाजलेला चित्रपट आठवतोय का? बरोबर ओळखलंत. 'काला पत्थर'. कोळसा खाण कामगारांच्या जीवनावर बेतलेला एक अप्रतिम चित्रपट. अनेकांनी हा चित्रपट पाहिला देखील असेल. चित्रपटाच्या शेवटी दिग्दर्शकाने चितारलेला तो चित्तथरारक

क्लायमॅक्स अजूनही डोळ्यासमोर तरळतो. आत्तापर्यंत हिंदी चित्रपट सृष्टीत अशा वेगळ्या विषयाला कोणीही हात घातलेला नव्हता. त्याचे सारे श्रेय अर्थातच निर्माते-दिग्दर्शक यश चोप्रा यांना जातेच. त्यानंतर हाच विषय घेऊन बॉलिवूड मध्ये अद्यापपर्यंत कोणी असा प्रयोग केल्याचे स्मरत देखील नाही.

किती वाचक-रसिकांना माहिती आहे की असेच एक धाडस मराठी साहित्य सृष्टीत एका प्रतिभाशाली, सिद्धहस्त लेखकाने केले होते. अनिल बर्वे. असे त्या लेखकाचे नाव आहे.

दि. २७ डिसेंबर १९७५. हिंदुस्तानच्या इतिहासातला एक काळाकुट्ट दिवस. झारखंड राज्यातील धनबाद या गावाजवळील 'चासनाला ' या कोळशाच्या महाकाय खाणीत अचानक अतिशय वेगाने पाणी घुसते, खाणीत काळ्या पाण्याचा महापूर. या महापुरात एकूण तीनशे ऐंशी खाण कामगारांचा दुर्देवी मृत्यू होतो. हा अपघात होता की... आणखीन काय? या घटनेने देशवासीय हळहळले तर या भीषण दुर्घटनेचे पडसाद अवघ्या जगभरात उमटले.

मुजोर खाण मालकाचा उद्दामपणा, खाण कामगारांची अगतिकता, मिळालेली गुलामासारखी वागणूक, या खाण व्यवहारात गुंतलेले राजकीय मंडळींचे हितसंबंध, मालकाच्या पिळवणुकीविरुद्ध आणि गुंडगिरीविरुद्ध उभा राहिलेला प्रामाणिक

युनियन लीडर, आजूबाजूची सामाजिक परिस्थिती आणि ही एक ना एक दिवस ही दुर्घटना घडणार आहे असे संकेत आणि पुरावे मिळूनही त्याकडे दुर्लक्ष करणारी नोकरशाही, हुकूमशाही. काही वर्षे लोटली, देशातली जनता ही घटना विसरूनही गेली, दोषी व्यक्तींवर, कंपनीवर यथावकाश खटलेही भरले गेले, निकाल लागला. लोकं सारंकाही विसरून गेली. मराठीतला एक लेखक मात्र या घटनेमुळे प्रचंड अस्वस्थ झाला होता, या भीषण प्रसंगांचे पडसाद त्याच्या संवेदनशील मनावर आघात करीत होते. 'चासनाला' या खाणीतले दुर्दैवी कामगार त्या लेखकाशी जणू बोलू लागले, आपली वेदना सांगू लागले.

आणि... आणि एका फेब्रुवारी १९८१ रोजी त्या संवेदनशील लेखकाची कादंबरी प्रकाशित झाली. ‘अकरा कोटी गॅलन पाणी’. मॅजेस्टिक या अव्वल प्रकाशन संस्थेने ही छोटेखानी पण महत्वाच्या विषयाची कादंबरी प्रकाशित केली. त्या... त्या लेखकाचे नाव होते अनिल बर्वे. (१९४८ ते १९८४) मराठी साहित्य विश्वात प्रथमच कोळसा कामगारांचे भकास आणि उध्वस्त जीवन चित्रित करण्यात आले. अनिल बर्वे. आपल्या वैशिट्यपूर्ण शब्दशैलीने वाचक रसिकांना संमोहित करणाऱ्या अनेक कलाकृती त्यांनी साकारल्या आहेत. कादंबरी, कथा आणि नाटक या तिन्ही माध्यमांवर जबरदस्त हुकूमत असणारा मराठी साहित्य विश्वातला

एक महत्वाचा लेखक. थँक यू मिस्टर ग्लाड, डोंगर म्हातारा झाला, पुत्र कामेष्टी, आकाश पेलताना, मी स्वामी या देहाचा आणि नाट्यसृष्टीत माईल स्टोन ठरलेले आणि प्रचंड गाजलेले हमीदाबाईची कोठी (१९७९). ही सर्व गंभीर विषयाची नाटकं रसिकांच्या मनात रुजलेली आहेत. त्याचप्रमाणे युद्धविराम, स्टडफार्म, कोलंबस वाट चुकला या कादंबऱ्या आणि मा निषाद आणि फाशीगेट हे कथासंग्रह देखील गाजले.

. अकरा कोटी गॅलन पाणी ही कादंबरी अनिल बर्वे यांना कशी काय स्फुरली असेल असा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे. अनिल बर्वे हे हाडाचे पत्रकार आणि उत्तम संपादक होते. बी. ए. ची पदवी प्राप्त केल्यानंतर बर्वे काही काळ राजकीय चळवळीत सक्रिय होते. 'रणांगण' या साप्ताहिकाचे ते संपादक होते. अत्यंत ज्वलंत आणि स्फोटक विषयांवर त्यांनी भाष्य केले होते. सन १९७७ ते ७८ च्या दरम्यान 'चासनाला खाण दुर्घटने संदर्भात श्री बर्वे यांनी वृत्तांतलेखन केले होते. ते लेखनही खूप गाजले. आणि हाच भलामोठा विषय कादंबरीसाठी त्यांना खुणावू लागला. या दुर्घटनेसंदर्भातील अनेक लेख त्यांनी एकत्रित केले होतेच. पण बळी गेलेल्या निष्पाप खाण कामगारांच्या कुटुंबांना, आजूबाजूच्या संबंधित अधिकाऱ्यांना, काही माहितीदारांना, अनेक लोकांना भेटून श्री बर्वे यांनी मोठ्या कष्टाने माहिती जमवून कच्चे लिखाण तयार केले. हा विषय जणू

बर्वे यांच्या मानगुटीवरच बसला होता. आणि शेवटी फेब्रुवारी १९८१ रोजी अनिल बर्वे यांची बहुचर्चित कादंबरी प्रकाशात आली. अवघ्या शंभर पानांच्या या कादंबरीने साहित्य विश्वात मोठी खळबळ उडवून दिली. कारण असा असामान्य विषय वाचक रसिकांना नवीनच होता. एकदा ही कादंबरी हाती आली की वाचक एकाच बैठकीत ती वाचूनच खाली ठेवतो. कादंबरी पूर्ण वाचल्यावर वाचक अंतर्मुख होतो, मनोमन हादरून जातो, नि: शब्द होतो. याचे सारे श्रेय अर्थातच सिद्धहस्त लेखक, नाटककार अनिल बर्वे यांनाच जाते. परंतु आपल्या मराठी साहित्य विश्वाचे दुर्देव म्हणजे वयाच्या अवघ्या छत्तिसाव्या वर्षी त्यांचे अकाली निधन झाले.

या लेखाच्या निमित्ताने लेखक अनिल बर्वे यांच्याबद्दलची, त्यांच्या पुढील पिढीची माहिती वाचक रसिकांना द्यावी असे वाटते. मागील वर्षी म्हणजेच २०१८ मध्ये गाजलेला 'तुंबाड' हा भयचित्रपट आठवतोय का? थेट हॉलिवूडच्या तोडीचा हा भव्य चित्रपट अनिल बर्वे यांचे चिरंजीव राही अनिल बर्वे यांनी बनवलेला आहे. तसेच प्रख्यात नृत्यांगना आणि कोरिओग्राफर फुलवा खामकर ही अनिलजींची कन्या. सगळयात महत्वाचे म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे पुरस्कर्ते, शाहीर अमर शेख हे राहीचे आजोबा! तर प्रख्यात लेखिका मालिका अमर शेख या


राहीच्या मावशी होत. इतकी भली मोठी आणि समृद्ध परंपरा लाभलेल्या कुटुंबात राही अनिल बर्वे हा देखील आपल्या बाबांसारखेच कलाक्षेत्रात वेगवेगळे प्रयोग करीत आहे.

'अकरा कोटी गॅलन पाणी' ही एक भयाण शोकांतिका आहे. लेखकाने अनेक व्यक्तिमत्त्वांचा सूक्ष्म अभ्यास करून त्या सत्यघटनेवर परखड असे भाष्य करीत हे नाट्य चित्रित केले आहे. भद्रपूर कोल्डफिल्डचा अनभिषिक्त सम्राट आणि खाण कामगारांना गुलामासारखे वागवून त्यांचे रक्त शोषणारा सर जमनादास मेहता. या मालकाच्या पदरी काम करणारा निष्ठावंत, प्रामाणिक मात्र अगतिक खाणीचा इंजिनियर स्वामी. हा स्वामी या खाणीचे अंतरंग ओळखून आहे. या खाणीत एक ना एक दिवस पाणी घुसणार आणि आक्रीत घडणार हे पक्के माहिती. तो हात जोडून सांगतोय खाण मालकाला, मॅनेजरला, खाण मंत्र्याला, अगदी सर्वांना. पण पैश्याच्या हव्यासापायी, सत्तेच्या भागीदारीत राजकारणी आणि मालक मंडळी स्वामींच्या बरळण्याकडे दुर्लक्ष करून कामगारांना मृत्यूच्या दरवाजापाशी नेत आहेत. दिवेचा (खाण मॅनेजर), सोनुसिंग (मुजोर खाणमंत्री), पिंटो (तरुण युनियन लीडर), रामप्रसाद (पूर्वीचा लीडर) या व्यक्तिरेखा आपणाला कादंबरीत भेटत राहतात आणि पुढे काय होणार याची उत्कंठा वाढवतात. तो दिवस उजाडतोच. सैतानी खदान खाणीत कोळशाच्या हव्यासापोटी सुरुंग

लावले जातात, आणि..... आणि.. अखेर एकाचवेळी करोडो गॅलन पाणी राक्षसासारखे खाणीत घुसते. सर्वत्र काळेकुट्ट विषारी पाणी. चारशे कामगार एकाचवेळी तडफडून मरतात. दिवेचा, पिंटो. रामप्रसाद सारे सारे अदृश्य होतात. मग... मग.. त्या स्वामींचे काय होते? सोनुसिंग, मेहता यांना शिक्षा होते का? अंगावर सरसरून काटा आणणारी ही भयाण शोकांतिका जणू आपण मोठ्या स्क्रीनवर पाहत आहोत असे ताकदीचे लिखाण अनिल बर्वे यांनी केले आहे. क्षणाक्षणाला वाचकांची उत्कंठा वाढवणारी ही विलक्षण कादंबरी आपणाला एका वेगळ्याच अनुभूतीच्या विश्वात नेऊन सोडते, विचार करायला प्रवृत्त करते हे नक्की.

(अकरा कोटी गॅलन पाणी (कादंबरी), अनिल बर्वे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई)

# 12. ** मतकरींच्या गूढ कथांचे अरण्य **




"ड्रॅक्युला... माणसाचे रक्त पिणारा. एकदा प्याल्यानंतर त्या रक्ताची चटक लागून माणसाला पुरते शोषणारा.. प्रथम त्या माणसाच्या गळ्याजवळ एक दिसेल न दिसेल असे लहानसे छिद्र.. मग हळूहळू तो माणूस रक्त सरून फिकट पडत चाललेला.. हळूहळू कोरडा पडलेला.. त्याच्या रक्तावर पोसत चाललेला ड्रॅक्युला..

काउंट ड्रॅक्युला रात्री फिरणारा, दुपारी निद्रिस्त असलेला ड्रॅक्युला. ड्रॅक्युलाचे अनेक साथी त्याच्यासारखेच रात्री फिरणारे -- दुसऱ्याचे रक्त शोषणारे. त्यावरच पोसणारे. मध्यरात्रीनंतरच्या काळोखात या एकांत वाटेवर ड्रॅक्युला डोळ्यांसमोर येत राहतो. चौघांमध्ये मिलिंद अतिशय भित्रा आणि नाजूक आहे. मी त्याच्या खांद्यावर हात लपेटलेला... त्याच्या काळजाने ठाव सोडलेला... ड्रॅक्युलाच्या भीतीने तो कदाचित आज रात्री झोपणारसुद्धा नाही."

माझ्या पिढीने आणि माझ्याही अगोदरच्या पिढीतल्या वाचकाने (म्हणजे जेव्हा सोशल मीडियाचे आक्रमण नव्हते तो काळ!) भरपूर प्रमाणात रहस्यकथा, भयकथा, गूढकथा वाचलेल्या आहेत. काही जणांनी तर त्या पुस्तकांची जणू पारायणे केली होती. आठवतात का? रहस्यकथाकार बाबुराव अर्नाळकर, गुरुनाथ नाईक, तसेच भयकथाकार नारायण धारप? या लेखक मंडळींना आणि त्यांच्या पुस्तकांना वाचक रसिकांचा अभूतपूर्व असा प्रतिसाद लाभला. त्यांचा वाचक वर्ग देखील अफाट होता. अगदी कामगारवर्गापासून ते थेट तारांकित समूहात राहणाऱ्या कलावंतांपर्यंत. बाबुराव अर्नाळकर यांची जवळजवळ चौदाशे पुस्तके प्रकाशित झाली तर गुरुनाथ नाईक यांची बाराशे पुस्तके प्रकाशित आहेत. त्यातील काही प्रती आता शिल्लकही नसाव्यात. आता बोला!. मात्र इतकी प्रचंड लोकप्रियता मिळूनही त्यांचे लेखन

हे मराठी वाङ्मय प्रकारात समाविष्ट केले जात नसे. ही रुखरुख त्यांनाही होतीच. असो. काही मंडळींनी स्टीफन किंग किंवा रस्किन बॉंड यांच्या भयकथा देखील वाचल्या असतील. पूर्वीच्या तुलनेने मात्र या भयकथा वाचण्याचे प्रमाण काहीसे नक्कीच कमी झालेले दिसते.

जागतिक साहित्य विश्वात भयकथांची मोठी समृद्ध अशी परंपरा आणि अशा कथांना अजूनही प्रचंड मागणी आहे. पिशाच्च, भूत अशा अनेक गूढ प्रतिमांचा शोध घेत, त्यांचा वापर करीत, तर कधी त्याची नाळ विज्ञानकथेशी जोडीत विदेशात अनेक उत्तमोत्तम साहित्यकृती निर्माण झाल्या. आणि विशेष म्हणजे अशा साहित्य कृतींवर आधारित भव्य चित्रपट देखील साकारले. एच. पी. लव्हक्राफ्ट, स्टिफन किंग, थॉमस लिगोटी यासारखे दमदार लेखक केवळ उत्तम भयकथा लिहिणारे म्हणून सर्वत्र ओळखले जातात. त्यांच्या अनेक साहित्यकृतींना सन्मानित केले जाते, एकीकडे रसिकांचे उदंड प्रेम आणि दुसरीकडे भरपूर पैसाही मिळतो. आणि... आणि.. आपल्याकडे मात्र या भयकथांना दुय्यम दर्जाचे स्थान दिले जाते. नारायण धारप यांच्यानंतर भयकथा लिहिणारे लेखक का कमी झाले असावेत? त्यांची कारणे अर्थात वेगवेगळी असावीत. असो.

अशी सारी पार्श्वभूमी असताना बालरंगभूमीसाठी मोलाचे काम करणारे, नाटक, कादंबरी, कथा, प्रायोगिक नाटके यामध्ये वेगवेगळे प्रयोग करणारे एक महत्वाचे लेखक रत्नाकर मतकरी यांनी साधारणतः तीस -चाळीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या भयकथा नक्की वाचाव्यात अशा आहेत. मतकरी यांच्या भयकथा हा एक वेगळाच विषय होईल. कारण नारायण धारप यांच्या सारखी ती टिपिकल भयकथा नाही. मतकरी यांची गूढकथा वाचताना भय वाटते मात्र त्यांच्या कथांना गूढतेचे एक वेगळेच वलय आहे. कथांमध्ये भुतेदेखील आहेत. मात्र तीही वेगळ्याप्रकाराची आहेत. कथा वाचताना कुठलीतरी अदृश्य शक्ती आपल्याभोवती वावरत आहे आणि आपण त्या कथेच्या केंद्रस्थानी हळूहळू ओढले जात आहोत अशी काही अवस्था वाचकांची होतेच. मतकरींच्या काही निवडक गूढकथांवर आधारित दूरदर्शनवर साकारलेली 'गहिरे पाणी' ही मालिका प्रचंड गाजली.

त्यापैकीच एक 'संभ्रमाच्या लाटा' हा गूढकथा संग्रह मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी १९७८ मध्ये प्रकाशित केला. त्यानंतर संग्रहाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या, पुनर्मुद्रण झाले. पुस्तकाच्या प्रारंभीच 'गूढकथेचे गूढ' हे मतकरी यांचे वेगळ्याप्रकाराचे मनोगत गूढ शैलीत लिहिले आहे. मतकरी आपल्या मनोगतात म्हणतात''माझ्या बहुतेक गूढकथांचा शेवट, काही अपवाद

सोडल्यास, ते एकदम पोटात लाथ बसल्यासारखे नसतात. कारण मूलतः क्रौर्य माझ्या व्यक्तिमत्वाशी सुसंगत नाही. याउलट जे असहाय आहेत त्यांच्याविषयी सहानुभूती दाखवून माझी कथा संपते. याचं उत्तम उदाहरण म्हणजे 'खेकडा' ही कथा. गूढकथा म्हणजे केवळ रहस्यकथा असे मी मानीत नाही. मानवी मनाला जे गूढ वाटतं, ते सारं काही त्यात येतं. पिशाच्च कथेपासून ते प्रत्यक्ष मानवी मनापर्यंत सारं काही. मरणाची कल्पना आपल्याला गूढ वाटते. आपल्या रोजच्या पाहण्यातल्या अनेक गोष्टी-म्हणजे आपल्याला होणारे भास, उत्कट भावनेपोटी केलेले असंभाव्य त्याग, योगायोग, आणि जे शास्त्रज्ञांनाही अजून पुरतं उलगडलेलं नाही ते माणसाचं मानसशास्त्र-या साऱ्या विषयांवरच्या कथा 'गूढकथा' या सदरातच मोडतात. गूढ गोष्टही वास्तवतेच्या नजरेतून दिसू शकेल अशी हवी!"

कथासंग्रहात एकूण दहा कथा आहेत. त्यापैकी 'ड्रॅक्युला' या कथेतला एक अंश मी लेखाच्या प्रारंभी अगदी जाणीवपूर्वक दिला आहे. याचे कारण एकूण दहा कथांमध्ये या कथेने माझी जणू झोपच उडवली होती. कथेच्या प्रारंभी मिलिंद, चव्हाण आणि शेवडे यांचा परिचय आणि त्यांच्यासमवेत असणारा 'मी'. कथेच्या मध्यवर्ती भागात कुठल्याही प्रकारचे क्ल्यू न देता लेखक आपल्याला अगदी अनपेक्षित वळणावर आणून सोडतो. शेवटच्या चार-पाच

ओळींतला तो महाभयंकर ट्विस्ट अंगावर कोसळतो. त्यातुन पुरते सावरणे वाचकाला शक्यच नसते. तो भोवंडत, हेलपाटत दुसऱ्या कथेकडे वळतो. तिथेही त्याची तीच अवस्था. अशा सर्वच कथा.!

जिथे अज्ञान आहे तिथे भय आहे. म्हणजे पहा, आमच्या तळकोकणात भुतांना तोटा नाही. अनेक मंडळी आम्ही भुतं प्रत्यक्ष पाहिली आहेत असे छातीठोकपणे सांगतात. काही जण कथा रचून, रंगवून सांगतात. या जगात भुतं आहेत की नाहीत हा वाद आपण बाजूला ठेवूया. पण ते स्थान काहीसे गूढ आहे आणि तिथली माणसं देखील तशी भासतात हे मात्र खरे आहे ना? या गूढ अवकाशाचा शोध घेणे आणि ते शब्दांमध्ये उतरवणे हे मतकरींनी केले. मतकरींच्या कथांचे हेच वैशिष्ट्य आहे की या नुसत्याच भय कथा नाहीत तर त्या गोष्टींमध्ये आपणाला माणसांच्या मनोव्यापाराचं सुरेख चित्रण, माणसाच्या चित्रविचित्र गूढ व्यक्तिमत्वाचे सूक्ष्म कंगोरे तसेच तेथील प्रदेशातले, निसर्गातले अनेक प्राचीन संदर्भही मतकरींनी बेमालूमपणे कथेत गुंफले आहेत. त्यामुळे कथा वाचताना शेवटी वाचक शक्य-अशक्यतेच्या गूढ वळणावर येऊन कोसळतो आणि तिथे कथाही संपते!

माणसाला मरणाबद्दलचे प्रचंड कुतुहूल, जिज्ञासा असते. मात्र ते तो जाणून घेण्यास घाबरतो. त्याचे कारण म्हणजे भीती.

मरणापलीकडचे जग हे कायम अज्ञात राहिले आहे कालही आणि आजही. मतकरींच्या गूढकथा नेमक्या याच अज्ञाताच्या परिघात उमलतात आणि त्या आपल्याला भयकथा, गूढकथा भासतात. मतकरींनी जाणीवपूर्वक 'गूढकथा' हा अनोखा कथाप्रकार मराठी साहित्यात रुजवला. आणि विशेष म्हणजे मराठी साहित्य विश्वाने या साहित्यप्रकाराची गंभीरपणे दखल घेतली हेही नसे थोडके. याचे सारे श्रेय मतकरींच्या लेखनशैलीला जातेच.

'विहीर' या कथेची सुरवातच विलक्षण आहे. लेखक विचारतो. 'जगातली सर्वात सुरक्षित जागा कुठली? सगळे म्हणतील घर. पण या प्रश्नाचे उत्तर आहे 'विहीर' आणि मग त्या विहिरीचे अंतरंग, बाह्यरंग आपल्याला शेवटपर्यंत खिळवून ठेवते. 'सोनाराची बायको' कथेची सुरवात अगदी साधी, सोपी आणि सरळ आणि शेवट अंगावर येणारा! 'जाळ' कथेचा नायक आपल्याशी संवाद साधत असतो आणि.. एकाएकी? आपण मटकन पुस्तक मिटून घेतो आणि शांत जागेवर पडून राहतो. 'पाप' कथेतील रक्त, तो आसुरी आनंद, ती लालसा आपल्याला निःशब्द करते. मिशीवाला कथेतली ती बोबडी मुलगी आपल्याला रात्रभर झोपून देत नाही तर ' सिक्वेन्स' कथेतले ते हॉटेल, ते कालचक्र, ती वेळ आणि ती व्यक्ती आपल्याला चक्रावून सोडते.


या कथासंग्रहातील कथांची तपशीलवार झलक, तो विषय मी इथे देण्याचे टाळतो आहे कारण या कथा वाचकांनी निवांतपणे वाचाव्यात आणि ते गूढपण, ते झपाटलेपण ज्याने त्याने एकांतात अनुभवावं. मी आता थांबतो कारण बाहेर पाऊस पडतोय, दरवाजावर टकटक वाढली आहे आणि खोलीतले लाईट देखील गेले आहेत. तेव्हा...

कथा, कादंबरी, एकांकिका, दीर्घांक, दूरदर्शन मालिका, नाटक, चित्रपट अशा सर्व माध्यमांवर जबरदस्त हुकूमत असणारे आणि बालरंगभूमी, प्रायोगिक रंगभूमी, आणि व्यावसायिक रंगभूमीवर वेगवेगळे प्रयोग करणारे प्रयोगशील नाटककार, गूढकथाकार, कादंबरीकार रत्नाकर मतकरी यांची चटका लावणारी एग्झिट मन व्याकुळ करून गेली. सर्वात महत्वाचे म्हणजे मतकरींनी लेखनाबरोबरच सामाजिक बांधिलकी प्राणपणाने जपली, वाढवली. 'वंचितांच्या रंगमंचाचे ते प्रणेते होते. ठाण्यामध्ये या रंगमंचाच्या वतीने होणाऱ्या कार्यक्रमास मतकरी सर आवर्जून उपस्थित रहात आणि मार्गदर्शन करीत. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टचे ते माजी विश्वस्त होते. १९५५ मध्ये वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी त्यांची 'वेडी माणसं' ही पहिलीवहिली एकांकिका मुंबई आकाशवाणीवरून प्रसारित झाली आणि त्यानंतर अगदी कालपर्यंत अखंडपणे त्यांचे लेखन, वाचन सतत सुरूच होते.

लोककथा-७८ या नाटकाने तर इतिहास घडवला. पुढे दुभंग, अश्वमेघ, खोल खोल पाणी, जावई माझा भला, घर तिघांचं हवं, माझं काय चुकलं?, आणि अलीकडचे आरण्यक व इंदिरा या नाटकांनी नाट्यरसिकांच्या मनामध्ये तर खास घर केले होते. खास मुलांसाठी अलबत्या गलबत्या आणि निम्मा शिम्मा राक्षस तर सध्या रंगभूमीवर धुमाकूळ घालीत आहेत. कादंबरी लेखनाबरोबरच खास मतकरी शैलीत त्यांनी साकारलेल्या गूढ कथा म्हणजे वाचक रसिकांसाठी मोठी पर्वणीच. ३० ते ४० वर्षांपूर्वी लिहिलेल्या या गूढकथा अजूनही वाचकांना चकवा देतात. मतकरींची वाङ्मयसंपदा समृद्ध आहे. मोठ्यासाठी ७० तर मुलांसाठी २२ नाटके त्यांनी लिहिली. २० कथा संग्रह, तीन कादंबऱ्या, १२ ललित लेख संग्रह, आणि 'माझे रंगप्रयोग' हा आत्मचरित्रामक ग्रंथ. गहिरे पाणी, अश्वमेघ, बेरीज वजाबाकी या दूरदर्शन मालिका, इन्व्हेस्टमेंट सारखा आशयघन चित्रपट असे बरेच लेखन, प्रयोग ते सतत न थकता करीत होते.

(संभ्रमाच्या लाटा (गूढकथा संग्रह), रत्नाकर मतकरी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे)

# 13. ** विचारचित्रांचा 'कोरा कॅनव्हास' **




"माणसाला श्वासोच्छवास करण्यासाठी जशी मोकळी जागा लागते, तशीच चित्रावकाशात आकारालाही जागा लागते. आणि म्हणूनच एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त आकार एकत्र आले तर त्यांची गर्दी होऊन ते चित्र गुदमरल्यासारखं वाटेल. ह्याउलट, जर अवकाशाच्या संदर्भात आकार एकुलता एक व लहान असेल तर बराचसा अवकाश उगाचच मोकळा राहिल्यासारखा वाटेल, म्हणजे त्या जागेत आणखी काही तरी असावसं वाटू लागेल. याचाच अर्थ असा की, चित्रामध्ये आकार आणि अवकाश यांचा समतोल साधला पाहिजे, आणि असा समतोल अनेक तऱ्हांनी साधता येतो."

"आपण शांतपणे ऐकू लागलो की रंग बोलतात, फिके रंग कुजबुजतात. मध्यम रंग बरंच काही सांगतात. तेजस्वी रंगांचा हलकल्लोळ माजतो. एकच गडद रंग प्रामुख्यानं कॅनव्हासवर हळूहळू पसरत जाईल तर तो सागरासारखा गंभीर ध्वनी निर्माण करतो. हलकेफुलके रंग, झुळझुळ वाहणाऱ्या वाऱ्यांसारखे मंद-मंद हुंकारतात, रंग गातात, जल्लोषही करतात. आणि कधी कधी मूक होऊन रंग ऐकतात. रंगांमधून संगीतातला सनातन 'सा', शांततेचा मुलंभूत नाद निघत असतो. रंग निर्माण करीत असलेलं हे संगीत डोळ्यांनी ऐकायचं असतं. रंगांचा आक्रोश पाहता पाहता ऐकू येतो."

"पेंटिंग पूर्ण झालं असं लक्षात आल्यावर एक विलक्षण आनंद होतो व मनावरचा ताण एकदम सैल होतो. आणि एकदम मोकळं वाटावयास लागतं. पेंटिंगच्या पूर्णावस्थेत येताना मला दही हंडीच्या अगदी जवळ आल्यावर त्या व्यक्तीला जसा सर्व तऱ्हेचा तोल सांभाळावा लागतो तसा अनुभव येतो. थोडं जरी चुकलं तरी पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करण्याची वेळ येऊन ठेपते. आता उद्यापासून नवीन पेंटिंग सुरु करायचंय.!"

आत्तापर्यंत चित्रकला संदर्भातील अनेक पुस्तके मी वाचली आहेत. त्यामध्ये चित्र कसे काढावे, कसे रंगवावे, कुठले रंग, ब्रश वापरावेत, त्याचबरोबर कुठला कागद वापरावा आणि अन्य

तंत्रविषयक माहितीची रेलचेल त्या पुस्तकांमध्ये असायची. एखाद्या नवोदित चित्रकाराला चित्र शिकण्यासाठी हे सारं आवश्यक असते, त्याबद्दल वाद नाहीच. परंतु चित्र काढण्यापूर्वीची पार्श्वभूमी, तनमनात उठणारे सूक्ष्म तरंग, आणि भावनांचे वादळीही! चित्र म्हणजे काय? ते का काढायचे? कशासाठी? कसे काढावे? चित्र आणि मानसिकता, भोवतालची परिस्थिती, आंदोलने वगैरे वगैरे गोष्टींचा रसपूर्ण उहापोह करणारे आणि प्रत्येक नवोदित तसेच प्रस्थापित चित्रकाराला सहज आकलन होणाऱ्या विलक्षण वाङ्मयीन शब्दशैलीत कागदावर साकारलेले हे एक महत्वाचे पुस्तक म्हणजेच"कोरा कॅनव्हास". कधी कधी रंग, आकार आणि अवकाश यांची भाषा सर्वसामान्यांना समजणे ही खरोखरच अवघड गोष्ट असते. त्यांच्यासाठी सोप्या भाषेत लिहावे हा एकमेव उद्देश मनाशी ठरवून हे मौलिक पुस्तक ख्यातनाम चित्रकार कै प्रभाकर बरवे यांनी साकारले आहे.

'कोरा कॅनव्हास' वाचताना, समजून घेताना बरवे यांनी रेखाटलेली अनेक अक्षर-चिंतने जी त्यांच्या चित्रांइतकीच सुंदर, वेगळी आहेत ती चिंतने आपणास पुस्तकात जागोजागी अनुभवायला मिळतात आणि आपण वाचक, रसिक, चित्रकार हळूहळू प्रगल्भ होत जातो. हीच या लेखनाची शक्ती आहे. चित्र आणि विचार यांचा अनोखा मिलाफ या पुस्तकात वाचकाला

प्रत्ययाला येतो. साहित्य आणि चित्रकला हे तर दोन वेगवेगळे प्रवाह. मात्र या पुस्तकाच्या निमित्ताने या दोन्ही प्रवाहांचा सुंदर संगम या पुस्तकात पहायला मिळतो. मला तर वाटतं अशा पद्धतीचे हे पहिलेच पुस्तक असावे.

मुंबईच्या मौज या ख्यातनाम प्रकाशन संस्थेने कै प्रभाकर बरवे यांचे चित्रविचारांचे हे पुस्तक २७ मार्च १९९० रोजी प्रकाशित केले.. या पुस्तकाच्या प्रयोजनाबद्दलचे आपले स्पष्ट मत आणि भूमिका आपल्या मनोगतात लेखकाने मांडली आहे. बरवे आपल्याशी संवाद साधतात.

"चित्रकार जेव्हा प्रत्यक्ष चित्र रंगवीत नसतो, तेव्हाही तो कळतनकळत चित्रविचारांतच गुंतलेला असतो. शब्दांतून व्यक्त होणाऱ्या जाणिवांचा शोध आपल्याला झटकन लागतो मात्र त्या मानाने रंग, रेषा, आकार यांची भाषा तितकीशी परिचित नसते. ही चित्रभाषा, चित्रविचार सोप्या पद्धतीने मी लिहिण्यास सुरवात केली, अगदी सहजपणे. चित्र साकारताना जे जे विचार मनात येईत ते शब्दबद्ध करण्याचा मी प्रयत्न करू लागलो. त्यासाठी वेळोवेळी मी डायरीमध्ये हे चित्रानुभव टिपून ठेवायचो. हे लेखन प्रथम मी चित्रकार गोपाळ आडिवरेकर यांना दाखवले, त्यांनी ते कवयित्री, चित्रकार वासंती मुझुमदार यांना दाखवले. यथावकाश त्या डायऱ्या

कविवर्य वसंत बापट यांचे पर्यंत पोचल्या. त्यांना हे लेखन विलक्षण आवडले आणि त्यांनी साधना या मासिकात छापले. एकेदिवशी कवी वसंत बापट यांनी मौजचे संपादक, समीक्षक श्री. पु. भागवत यांचेकडे हा विषय काढला, सर्व लेखन दाखवले. श्री. पु प्रभावित होऊन माझ्या लेखनावर आवश्यक ते संस्कार करून त्या लेखांचे आणि काही निवडक चित्रांचे, रेखाटनांचे सुंदर पुस्तक काढले. 'कोरा कॅनव्हास' हे पुस्तक कवी वसंत बापट यांच्यामुळे साकारले.”

अतिशय गंभीर प्रवृत्तीचे चित्रकार प्रभाकर बरवे (१९३६ ते १९९५) हे १९६२ साली जे. जे. स्कुल ऑफ आर्टस् मधून बाहेर पडल्यावर त्यांनी स्वत्वाचा शोध घेतला. हिंदुस्थानातल्या तसेच परदेशातील अनेक चित्रकारांच्या कलाकृतींनी ते झपाटून गेले होते. तरीही स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण करण्यास अर्थातच त्यांना वेळ लागलाच. प्रारंभीच्या काळात प्रभाकर बरवे हे पॉल क्ली (१८७९-१९४०) या स्वीस चित्रकाराच्या चित्रशैलीने विलक्षण प्रभावित झाले होते. या दोघांमध्ये आपणास साम्य आढळते ते म्हणजे म्हणजे हे दोन्ही चित्रकार साठ वर्षे जगले, दोघेही डायऱ्या लिहीत, निरीक्षणे टिपीत, दोघांच्या चित्रशैलीत आपल्याला विषयापेक्षा विचार आढळतो. पुढे बरवे यांना आपली स्वतंत्र वाट सापडली. बरवे यांच्याकडे मार्गदर्शनासाठी अनेक विद्यार्थी येत असत. त्या छोटेखानी स्कुलवजा खोलीत बरवे अनेक चित्रकारांना

आपल्या चित्रांमधून विचार मांडायला शिकवीत, त्यांना व्यक्त होण्यास संधी देत. पुढे बरवे यांनी काही पुस्तकांची मुखपृष्ठे बनवली. परंतु त्यांना पूर्णवेळ चित्रकारच व्हायचे होते मात्र ते शक्य न झाल्याने त्यांनी भारतीय कला आणि संस्कृतीचा अभ्यास करणाऱ्या श्रीमती पुपुल जयकर यांच्या संस्थेत पंचवीस वर्षे नोकरी केली.

तब्बल दोन पिढ्यांवर प्रभाव टाकणाऱ्या थोर चित्रकार प्रभाकर बरवे यांच्या चित्रांचे, रेखाटनांचे पहिलेच प्रदर्शन त्यांच्या मृत्यूनंतर तब्बल चोवीस वर्षांनंतर याच वर्षी (८ फेब्रुवारी ते ८ मार्च २०१९) 'इन्साईड द एम्प्टी बॉक्स' या नावाने मुंबईच्या राष्ट्रीय आधुनिक कलादालनाच्या पाचही मजल्यावर जेव्हा भरले गेले तेव्हा अनेक जुन्या-नव्या चित्रकारांना, अभ्यासकांना, रसिकांना खरोखरच आनंद झाला, समाधान वाटले. हे चित्रविचार प्रदर्शन पाहण्याचे भाग्य मला लाभले. आत्तापर्यंत बरवे यांची अनेक चित्रे मी मासिकांतून पाहिली होती मात्र ती दुर्मिळ मूळ चित्रे प्रत्यक्ष अनुभवताना जे जाणवले ते शब्दातीत होते. चित्रांसोबतच बरवे यांच्या हस्ताक्षरातल्या काही डायऱ्या देखील प्रदर्शनात ठेवण्यात आल्या होत्या. पेंटिंगसोबत बरवे यांनी व्यक्त केलेले चित्रविचार डिस्प्लेच्या स्वरूपात लक्ष वेधून घेत होते. त्यातले काही विचार 'कोरा कॅनव्हास' या पुस्तकात आपणास सापडतात.

आर्ट गॅलरीत प्रवेश केल्यावर समोरच्याच एका मोठ्या कॅनव्हास वर बरवे यांनी व्यक्त केलेले चित्रविचार मनाला स्पर्शून गेले. ते मी माझ्या नजरेने टिपून घेतले. अतिशय तरल, संवेदनशील मन लाभलेल्या चित्रकार बरवे यांनी आपल्या अनेक चित्रांमध्ये मध्यमवर्गीय माणसाच्या जगण्याचे संदर्भ, आयुष्याची, अस्तित्वाची स्वगतं, संवेदना, निसर्गाची काही प्रतिकं, प्रतिबिंब उलगडून दाखवली आहेत. कधी कधी या विचार चित्रांचा परीघ, त्याची व्याप्ती ही वैश्विक स्वरूपाची असे. अमूर्त शैली आणि वास्तववादी शैली यांचा अनोखा मेळ, मिश्रण चित्रकार बरवे यांनी ताकदीने मांडले आहे. लेखणी आणि ब्रश या दोन्ही माध्यमांवर जबरदस्त हुकूमत असणाऱ्या चित्रकार बरवे यांच्याबद्दलचे कुतूहल दिवसेंदिवस वाढू लागले. आर्ट गॅलरी मध्ये प्रारंभीच डिस्प्ले केलेले चित्रकार बरवे यांचे हे स्वगत आपणास अंतर्मुख करते.

'प्रभाकर बरवे' हे नाव आहे. ते दुसऱ्यांनी ठेवले आहे. त्यांच्या हौसेमुळे, कुळाच्या अभिमानामुळे आणि दोन व्यक्तीतला फरक समजावा म्हणून हे नाव त्यांनी निर्माण केले. मात्र ह्या नावाशी 'ह्या शरिर-मनाच्या' क्रिया निगडीत झाल्या आहेत. माझ्या (?) हातून काही चांगले घडले की हे नाव 'उजळते'- वाईट घडले की हे नाव काळवंडते. हे नाव म्हणजे 'मी' नाही याचा सतत विसर पडत असतो. जसे हे शरिर जे अनेक उपाधींमधून जात असते. 'ते' म्हणजे

'मी' नाही, तसेच वरील 'नाव' म्हणजेही 'मी' नाही.''(५ डिसेंबर ८७).

कोरा कॅनव्हास पुस्तकाच्या अगदी शेवटी चित्रकार बरवे अगदी प्रांजळपणे नमूद करतात की''हे लिहीत असताना मला एका गोष्टीची पूर्ण जाणीव आहे आणि ती म्हणजे ह्यात सगळयामध्ये मी काहीही नवीन किंवा वेगळं सांगत नाही, कारण माझा अनुभव हा सनातन अनुभव आहे. ज्यांनी त्यांनी खिडकी उघडून आतमध्ये पाहण्याचा प्रयत्न केला त्या सर्वांचा हाच अनुभव आहे. खरं म्हणजे 'मी' हे केवळ निमित्त आहे.''

तेव्हा वाचक-रसिकांनो, समस्त चित्रकारांनो, अभ्यासकांनो 'कोरा कॅनव्हास' या पुस्तकाची अनोखी खिडकी उघडून बघणार ना? चित्रकार प्रभाकर बरवे यांच्या विलक्षण विचारचित्रांची अनुभूती आणि सृजनशक्तीचा अविष्कार पहायचा असेल तर हे पुस्तक जरूर जरूर वाचावे आणि रंग-रेषा-आकार यामध्ये स्वतः रंगून जावे.

(कोरा कॅनव्हास (आत्मकथन), प्रभाकर बरवे, मौज प्रकाशन)

दिवसातून दोन तास पुस्तक वाचणे आणि तेवढाच वेळ फ़ेसबुक किंवा whatsapp वरच्या पोस्ट्स वाचणे यात नेमका काय फ़रक असतो? असतो का? दोन्हीही वाचनच ना!

रोज एका गार्डनला प्रदक्षिणा घालत आठ-दहा किमि. चालण्याऐवजी रोज तेवढाच वेळ एका दिशेने चालत राहिलं तर माणूस पाच महिन्यांत मुंबईहून दिल्लीला पोहोचेल. नेमका हाच फ़रक फ़ेसपुस्तक आणि पुस्तक यांच्यामधे असतो.

पुस्तक वाचन एखाद्या मोठ्या गुंतवणुकीसारखे असते जे तुम्हाला श्रीमंत करत असते. Whatsapp, facebook मधले ज्ञान खिशात बाळगलेल्या चिल्लरसारखे असते. ते कुठून येते आणि कसे जाते याचा हिशेब नसतो.

पुस्तक वाचन तुम्हाला पुढे नेते, प्रगतीच्या वाटेवर नेते. एका दिशेला नेते.  एका उंचीवर नेते. पुस्तके वाचणारे लोक इतरांहून अधिक शहाणे असतात. शहाणे होतात. वाचनात सातत्य असणारे अधिकाधिक शहाणे मिळवत रहातात.

अनुभवाहून उत्तम पुस्तक नाही असे म्हटले जाते. पण शेवटी पुस्तक म्हणजे काय? कोणाचे तरी अनुभवच ना? असे दुसऱ्याचे अनुभव वाचून माणूस शहाणा होतो. पुढच्याच्या ठेचा मागच्याला

शहाणे करून सोडतात. मग ते पुस्तक दुसऱ्या देशातील लेखकाचे असो वा दुसऱ्या काळातील लेखकाचे. शहाणपण गॅरंटीड.

**वाचत रहा. ग्रंथानंद घेत रहा.**

www.esahity.com

esahity@gmail.com